सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २३ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# विरोधकांचे ‘नरेटिव्ह’ भुईसपाट

## भाजपच्या ऐतिहासिक यशावर मुख्यमंत्री फडणवीसांची विरोधकांवर टोलेबाजी!

**नागपूर :** राज्यातील नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीच्या निकालांनी महाराष्ट्राचे राजकीय चित्र पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे. काल जाहीर झालेल्या निकालांमध्ये महायुतीने विरोधकांना धोबीपछाड देत घवघवीत यश संपादन केले आहे. विशेषतः भारतीय जनता पक्ष हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असून, पक्षाचे ३ हजारांहून अधिक नगरसेवक निवडून आल्याने भाजपच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. या ऐतिहासिक विजयाचे औचित्य साधून आज नागपूरमध्ये एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगराध्यक्ष आणि नगरसेवकांचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांच्या मेहनतीला आणि सरकारच्या विकासकामांना दिले. नगरपालिका निवडणुकीतील हे यश आगामी काळातील राजकारणाची दिशा ठरवणारे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. निकालांच्या आकडेवारीनुसार, भाजपने अनेक महत्त्वाच्या नगरपालिकांमध्ये



स्वबळावर आणि मित्रपक्षांच्या साथीने सत्ता काबीज केली आहे. ३ हजारपेक्षा जास्त नगरसेवक निवडून येणे, हा भाजपचा राज्यातील आजवरचा सर्वात मोठा विजय मानला जात आहे. मुख्यमंत्र्यांनी आपल्या संबोधनात निवडून आलेल्या प्रतिनिधींना जनतेची कामे प्राधान्याने करण्याचा सल्ला दिला. या विजयामुळे स्थानिक पातळीवर महायुतीची पकड अधिक घट्ट झाली असून, आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला आहे.

राज्यातील जनतेने महाविकास आघाडीचा पूर्णपणे सफाया केला असून महायुतीच्या विकासकामांवर शिक्कामोर्तब केले आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. नागपूर जिल्ह्याच्या निकालावर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, नागपूरमधील २७ नगरपालिकांपैकी तब्बल २२ नगरपालिकांमध्ये भारतीय जनता पक्षाने निर्विवाद वर्चस्व मिळवले आहे. विशेष म्हणजे, ज्या भागात विरोधकांचे अभेद्य बालेकिल्ले मानले जात होते, ते आता पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहेत. सावनेरमध्ये आम्ही काँग्रेसमुक्त नगरपालिका तयार केली आहे, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.

राज्यातील एकूण चित्रावर प्रकाश टाकताना फडणवीस यांनी सांगितले की, संपूर्ण महाराष्ट्रात महायुतीचे ७५ टक्क्यांहून अधिक नगराध्यक्ष निवडून आले आहेत. याउलट, महाविकास आघाडीला केवळ ५० च्या आसपास नगराध्यक्षांवर समाधान मानावे लागले आहे. भाजपचा राज्यात सर्वाधिक ‘स्ट्राइक रेट’ राहिला असून, नगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या मार्गाला कौल दिला आहे. हा विजय म्हणजे केवळ आकडेवारी नसून जनतेने आमच्या कामाला दिलेली पावती आहे, असे म्हणत फडणवीस यांनी मतदारांचे आभार मानले. महायुतीला मिळालेले हे प्रचंड बहुमत आगामी राजकीय वाटचालीस अधिक बळ देणारे ठरेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

विरोधकांचे 'नॅरेटिव्ह' भुईसपाट

राज्यातील नगरपरिषद निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून, भारतीय जनता पक्ष आणि महायुतीने विरोधकांचा धुव्वा उडवत घवघवीत यश संपादन केले आहे. एकूण २८८ जागांपैकी तब्बल २३६ ठिकाणी भाजपच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक उमेदवारांनी विजय मिळवत स्थानिक स्वराज्य संस्थांवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीतील यशाची परंपरा महायुतीने या स्थानिक निवडणुकीतही कायम राखल्याचे चित्र दिसत आहे. या विजयामागे भाजप नेत्यांचे सूक्ष्म नियोजन आणि कार्यकर्त्यांची अहोरात्र मेहनत असल्याचे बोलले जात आहे. नेत्यांनी केवळ आदेश न देता प्रत्यक्ष मैदानात उतरून कार्यकर्त्यांच्या खांद्याला खांदा लावून ही निवडणूक लढवली, ज्याचा मोठा फायदा महायुतीला झाला.

## थोडक्यात...

### केवायसी न करणाऱ्या लाडक्या बहिणी अपात्र?

**मुंबई :** ई-केवायसी न करणाऱ्या लाडक्या बहिणी अपात्र ठरू शकतात. लाडक्या बहीण योजनेतून लवकरच ४० लाखांहून अधिक लाभार्थ्यांवर अपात्रतेची टांगती तलवार असणारेय. राज्य सरकारकडून ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी करण्याची मुदत देण्यात आली. मात्र आतापर्यंत केवळ १ लाख ६० हजार महिलांनीत ही प्रक्रिया पूर्ण केलीय. त्यामुळे या योजनेतील ४० लाख लाडक्या बहिणी अपात्र होऊ शकतात, अशी माहिती राज्य महिला आणि बालविकास विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

### सत्तारांचा रावसाहेब दानवेंवर निशाणा

**जालना :** संभाजीनगर जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीत भाजपला आपलं खातं उघडता आलं नाही. त्यामुळे भाजपच्या या पराभवामागे शिवसेनेचा हात असल्याची चर्चा सुरू झालीये. याच कारण म्हणजे अब्दुल सत्तारांचं सिल्लोडमध्ये निवडून आल्यानंतरचं वक्तव्य. यावेळी सत्तारांनी रावसाहेब दानवेंवर निशाणा साधला. जालन्यातील भोकरदनमध्ये तुमचा सुपडासाफ केला, असं वक्तव्य सत्तारांनी केलंय.

### दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आलेत : धनकवडे

**पुणे :** दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले आहेत, लवकरच जाहीर घोषणा होईल. दोन्ही पक्षातील नेत्यांचे बोलणं झाले आहे. ताई आणि दादांची याबाबत चर्चा झाली आहे. तुतारीचे उमेदवार घड्याळावर लढणार आहेत. येत्या दोन दिवसात दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार आहे. दोन्ही राष्ट्रवादी पुण्यात एकत्र येण्यावर चर्चा झाली आहे.

### राष्ट्रवादीला १६ जागा पण, नगराध्यक्ष भाजपाचा

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील ४ नगर परिषद आणि एका नगर पंचायतीच्या निकालात सर्वाधीक धक्का देणारा निकाल अहमदपूर नगर परिषदेचा मानला जातोय कारण राष्ट्रवादी अजीत पवार गटाचे १६ नगरसेवक निवडून आले असताना नगराध्यक्ष पद मात्र भाजपानं जिंकलंय. सहकार मंत्र्यांची सर्व ताकत पणाला लागली असतानाही बाबासाहेब पाटील यांना नगराध्यक्ष पदाची जागा गमवावी लागल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### संजय मांडवगड एका मताने विजयी

**मुंबई :** गडचिरोलीमध्ये भाजपचे उमेदवार संजय मांडवगडे यांचा प्रभाग क्रमांक ४ मध्ये फक्त एका मताने पराभव झाला. अंतिम मतमोजणीनंतर त्यांना ७१६ मते मिळाली, तर काँग्रेसचे उमेदवार श्रीकांत देशमुख यांना ७१७ मते मिळाली. पालघर जिल्ह्यातील वाडा नगरपंचायतीत प्रभाग क्रमांक ६ मधून भाजपच्या सिद्धी भोपतराव एका मताने विजयी झाल्या आहे.



## फटाके कारखान्यात स्फोट; दोघे गंभीर

**सांगली :** सांगलीच्या खानापूर तालुक्यातील भाळवणी येथे फटाके कारखान्यात भीषण स्फोट झाला आहे. शोभेच्या दारूचा स्फोट झाल्याचं समोर आलं आहे. स्फोट इतका शक्तिशाली होता की भाळवणीसह आसपासच्या पाच किलोमीटर परिसरात जमीन संपूर्णतः हादरली आहे. तसंच आसपासच्या वाहनांचे आणि घराच्या काचांना तडे गेल आहेत. या स्फोटानंतर एकच खळबळ उडाली आहे.

या स्फोटात दोन लोक गंभीर जखमी झाले आहेत. आफताब मन्सूर मुल्ला आणि अमीन मुल्ला अशी त्यांची नावं आहेत. या दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अग्निशमन दलाच्या मदतीने आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरु आहेत.

# मुंबई–नागपूर महामार्गावर भीषण अपघात

**मुंबई :** मुंबई–नागपूर राष्ट्रीय महामार्ग ५६ वर मलकापूरजवळ कारवरील नियंत्रण सुटल्याने भिषण अपघात झाला. या अपघातात कारमधील तिघेजण जागीच ठार झाले असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. धुपेश्वरहुन मलकापूरकडे येणारी कार रस्त्यालगत असलेल्या झाडाला धडकून हा भीषण अपघात झाला. चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यालगत असलेल्या झाडाला जोरदार धडकली. यात तिघांचाही जागेवर मृत्यू झाला. तर दोघे गंभीर जखमी झालेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मुंबई नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५६ वर धुपेश्वर होऊन मलकापूरकडे येणाऱ्या कारचा भीषण अपघात झाला. कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने कार थेट रस्त्यालगत असलेल्या झाडावर आदळली. ही धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झालाय.

या अपघातात रुद्र उमेश पवार, विनायक जनार्दन अत्तरकर या दोघांचा जागीच मृत्यू झाला. प्रशांत राजू वडारे गणेश दीपक इंगळे आणि तक्ष धुरंधर हे तिघे गंभीर जखमी झाले होते.

तिघांनाही पुढील उपचारासाठी अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान गणेश दीपक इंगळे या तरुणाचा मृत्यू झाला. त्यामुळे अपघातातील मृतांचा आकडा तिघांवर पोहोचला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अपघातग्रस्त वाहन हटवून घटनेचा पंचनामा करण्यात आला. प्राथमिक तपासात अतिवेग आणि नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाल्याचे समोर आले आहे.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना रुग्णालयात दाखल केल.या भीषण अपघातामुळे मलकापूर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## जागा वाटप फार ताणू नका : ठाकरे

**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शिवसेना आणि मनसे या दोन्ही पक्षांच्या नेत्यांना जागावाटपाची प्रक्रिया अनावश्यक ताणून न धरण्याच्या सूचना दिल्या आहेत. शिवसेना–मनसे युतीचे जागावाटप आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, आज या जागावाटपावर शिक्कामोर्तब होऊन अधिकृत माहिती दिली जाण्याची शक्यता आहे. यापूर्वीच राज ठाकरे यांनी हे महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. तर दुसरीकडे नागपूरमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याची मागणी लावून धरली आहे. कार्यकर्त्यांनी ही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासमोर मांडली आहे.













लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## मनोज सुवर्णकार यांची उपाध्यक्षपदी निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** अखिल भारतीय ओबीसी सेवासंघाच्या लातूर शहर उपाध्यक्षपदी मनोज हरिभाऊ सुवर्णकार (पोतदार) यांची निवड करण्यात आली आहे.

महापुरुषांचे कार्य व विचार समाजापर्यंत पोहचविणे, समाजाचे प्रश्न्न सोडविणे, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय भावना, सामाजिक बांधिलकीची भावना वाढीस लावण्याच्या दृष्टीने कार्य करणे. शेतकऱ्यांचे प्रश्न्न सोडविणे व त्यांना न्याय देणे, राष्ट्रीय सण साजरे करणे अशा विविध उद्देशाने या सेवासंघाची स्थापना करण्यात आली आहे. अ.भा. ओबीसी सेवासंघाचे संस्थापक अध्यक्ष हणमंत सुतार, प्रदेशाध्यक्ष तात्यासाहेब देढे, राज्य कोअर कमिटीचे सदस्य ताठ पुणे जिल्हाध्यक्ष प्रा. बाबासाहेब टेंगळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत लातूर शहर उपाध्यक्षपदी मनोज सुवर्णकार (पोतदार) यांची निवड करण्यात आली. मनोज सुवर्णकार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांची या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

लातूर शहर व परिसरात सेवासंघाच्या कार्याची व्याप्ती वाढवण्याच्या सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.



# लातुरातील वाहनधारक कधी पाळणार सिग्नलची शिस्त?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** लातूर शहरातील वाहनधारक शहरात मोजक्याच ठिकाणी चालू असलेल्या सिग्नलची शिस्त वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी समोर असूनही पाळताना दिसत नाहीत. त्यामुळे वाहतुकीच्या कोंडीसह किरकोळ अपघातांच्या संख्येत वाढ होण्याची भीती निर्माण झाल्याचे पावलोपावली पाहावयास मिळते. त्यामुळे वाहनधारकांना शिस्त लावण्यासाठी आता कॅमेऱ्यांच्या माध्यमातून ऑनलाईन दंड आकारण्याची पद्धती सुरु करावी, अशी मागणी होत आहे.

लातूर शहरात मिनी मार्केट, अशोक हॉटेल चौक, शिवाजी चौक, बार्शी रोडवरील दयानंद गेट, पाण्याची टाकी, पीव्हीआर चौक याठिकाणी सिग्नल चालू आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडून अंबाजोगाईला जाणाऱ्या रस्त्यावर जुना रेणापूर नाका, अहिल्यादेवी होळकर चौक येथे सिग्नल चालू आहेत तर गुळ मार्केट चौकातील सिग्नल चालू असतात. त्या व्यतिरिक्त गांधी चौक, हनुमान चौक, नंदी स्टॉप, खर्डेकर स्टॉप, आदर्श कॉलनी या ठिकाणी सिग्नल असूनही ते कायम बंदच असतात. तर औसा रोडवरील सर्वात वर्दळीच्या असणाऱ्या राजीव गांधी चौक व छत्रपती चौकात आवश्यकता असूनही सिग्नल व्यवस्था कार्यान्वित केली गेलेली नाही.

वाहतुकीच्या नियमात सिग्नल जवळील झेब्रा क्रॉसिंगलाही अनन्यसाधारण महत्व साठे. झेब्रा क्रॉसिंग पादचाऱ्यांना चालत



जाण्यासाठी असते. मुंबई-पुणे तथा महानगरात एखादा वाहनधारक झेब्रा क्रॉसिंगच्या लाईनमध्ये किंचितही पुढे आला की, त्याच्यावर कॅमेऱ्याच्या माध्यमातून ऑनलाईन दंडात्मक कारवाई तात्काळ केली जाते. त्यामुळे महानगरात सिग्नल क्रॉस करण्याची किंवा सिग्नल तोडण्याची हिंमत फारसे कोणी करताना दिसत नाही.

लातूर शहरात जेवढे काही सिग्नल चालू आहेत, त्या ठिकाणी सिग्नल बरोबरच झेब्रा क्रॉसिंगची शिस्तही कोणी पाळताना दिसत नाही. लातुरातील काही महाभाग वाहनधारक चक्क झेब्रा क्रॉसिंगच्याही पुढे तीन चार फूट येऊन थांबलेले आढळून येतात. अशा वाहनधारकांना पाहून वाहतूक शाखेच्या पोलिसांना त्यांच्यावर दंडात्मक कारवाई का करत नाहीत? अशी विचारणा केली असता, वाहनधारक काही केल्या ऐकत नाहीत, असे मोघम उत्तर ऐकायला मिळाले.

वाहनधारक वाहतूक शाखेच्या पोलीस कर्मचाऱ्यांसमोरून सिग्नल तोडून जाण्याची हिंमत करत असेल तर त्या बेशिस्तीला म्हणायचे तरी काय? असा प्रश्न सुजाण नागरीकातून उपस्थित केला जात आहे. शहरात ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकी वाहनधारकांची संख्याही खूप आहे. ते सुद्धा वाहतुकीच्या नियमांचे पावलोपावली उल्लंघन करत असल्याचे निदर्शनास येते. बिनधास्तपणे रस्त्यावरूनही ट्रिपल सीट जाणे, चौकात वाहतूक शाखेचा पोलीस कर्मचारी दिसला तर एकाला उतरविणे अथवा चौकातूनही ट्रिपल सीट सुसाट पळणे ते प्रकार वारंवार होताना आढळून येतात. एका बाजूचा सिग्नल चालू असताना वाहनधारकांना रस्ता देण्याऐवजी रस्त्याच्या मधोमध पुढे येऊन आपला सिग्नल कधी पडतोय याची वाट बघणारे विद्वान वाहनधारकही लातुरात कमी नाहीत. अशा प्रकारांमुळे एखादेवेळी अनावधानाने मोठी दुर्घटनाही घडू शकते, याचा विचार वाहनधारक करताना दिसत नाहीत. अशा गोष्टींकडेही वाहनधारकांनी जागरूकपणे पाहणे काळाची गरज आहे.

कोणत्याही शहरातील वाहनधारक वाहतुकीच्या नियमांचे पालन किती काटेकोरपणे करतात, त्यावर त्या शहराच्या नागरिकांच्या वागण्याचा दर्जा ठरविला जात असल्याचे बोलले जाते. त्या नियमानुसार चालल्यास तर लातूरच्या वाहनधारक नागरिकांना कोणत्या दर्जात बसवायचे? हाही खरा प्रश्न आहे. त्यामुळे लातूरच्या बेशिस्त वाहतुकीला, वाहनधारकांना शिस्त लावायची असेल तर महानगरांमध्ये ज्या प्रमाणे कॅमेऱ्यांच्या माध्यमातून ऑनलाईन दंड वसुलीची कारवाई केली जाते, अगदी तशाच प्रकारची कारवाई येथेही सुरु करणे अगत्याचे बनले आहे. तरच येथील वाहतुकीला शिस्त लागू शकणार आहे.

पोलीस प्रशासनाने या संदर्भात योग्य तो निर्णय लवकरात लवकर घ्यावा, जेणेकरून वाहतूक व्यवस्थेला शिस्त लागू शकेल, असे नागरिकांचे मत आहे.

# एकाच दिवसात पोलिसांच्या कारवाईत २८० वाहनांवर केसेस

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** लातूर शहर पोलीस वाहतूक नियंत्रण शाखेच्या वतीने एकाच दिवसात २२० ऑटोचालकांसह २८० वाहनांवर केसेस दाखल करून त्यांच्याकडून तब्बल ३ लाख १५ हजार ९०० रुपयांच्या दंडाची कारवाई करण्यात आल्याची माहिती वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी दिली.

लातूर शहरातील वाहनांना शिस्त लावण्यासाठी बुलेट सायलन्स (इंदौरी फटका) तसेच मोटारसायकलवर ट्रिपल शीतप्रवास करणारे आणि ऑटोचालकांवर ई-चलान मशीनद्वारे दंडात्मक कारवाईची विशेष शहरात चालूच आहे. पोलिसांकडून अशा प्रकारची मोहीम राबविण्यात येत आहे, हे ज्ञात असूनही वाहनधारकांत आणि ऑटोचालकांमध्ये फारशी सुधारणा झाल्याचे दिसत नाही.

शहरातील ऑटोचालकांना त्यांचे वाहन शिस्तीत चालवण्याच्या सूचना वारंवार देऊनही त्यांच्या कार्यपद्धतीत तिळमात्रही सुधारणा झालेली नसल्याचेच एकंदर परिस्थितीवरून दिसून येते. ऑटोचालकांना गणवेश नियमित वापरा, पुढच्या सीटवर प्रवाशी बसवू नका अशा सूचना नेहमीच पोलीस प्रशासनाकडून देण्यात येऊनही त्याचा काहीही उपयोग होत नसल्याचेच पाहायला मिळते. सोमवारी दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी एकाच दिवसात शहरात २२० ऑटोचालकांकडून १ लाख ९५ हजार ९०० रुपयांची दंड आकारणी केली गेली. तर अधिकच्या वेगाने वाहन चालवणे, कर्णकर्कश हॉर्नचा वापर करणे अशा एकूण ६० दुचाकींवर १ लाख २० हजार रुपयांचा दंड आकाराला गेला आहे.

पोलिसांकडून वाहतुकीला शिस्त लावण्याचे



प्रयत्न मागच्या अनेक दिवसांपासून चालू आहेत. परंतु ऑटोचालकांसह अन्य वाहनधारकांकडूनही पोलीस प्रशासनाला फारसे सहकार्य मिळत नसल्याचे एकंदर परिस्थितीवरून निदर्शनास येत आहे.

वाहतुकीला शिस्त लागल्यास शहरातील वाहतुकीची होणारी कोंडी टाळणे सहज शक्य होणार आहे. आजमितीस शहराच्या प्रमुख चौकात होणारी वाहतुकीची कोंडी हा वाहनधारकांसाठी नेहमीची डोकेदुखी होऊन बसला आहे.शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याच्या उद्देशाने पोलिसांकडून राबविली जाणारी ही दंडात्मक कारवाईची मोहीम नियमित राबविली जाणार आहे.

वाहनधारकांना जोपर्यंत शिस्तीत वाहने चालविण्याची सवय लागत नाही, तोपर्यंत ही कारवाई चालूच ठेवली जाणार असल्याचे पोलीस निरीक्षक दराडे यांनी सांगितले.

# प्रश्न विचारणेच गुन्हा असेल, तर लोकशाही उरली कुठे? : ॲड. भूषण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** भारतीय लोकशाही आज एका निर्णायक वळणावर उभी आहे. आणीबाणीच्या काळात सुध्दा तिच्यावर इतकी काळी छाया नव्हती, जितकी आज आहे. घटनात्मक संस्था, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणली जात आहे. प्रश्न विचारणेच गुन्हा ठरत असेल तर लोकशाही उरलीच कुठे? ही गंभीर चिंतेची बाब आहे, असे ठाम मत सर्वोच्च न्यायालयीन वकील ॲड. प्रशांत भूषण यांनी व्यक्त केले.

ॲड. प्रशांत भूषण यांना लातूर येथे ॲड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, त्याप्रसंगी ते बोलत होते. ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी विचार मंचतर्फे दयानंद सभागृहात त्यांचे 'लोकशाही पुढील आव्हाने' या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी सध्याच्या सामाजिक-राजकीय वास्तवाचे कठोर विश्र्लेषण केले. राष्ट्रीय सन्मान; वैयक्तिक नव्हे, लोकशाहीच्या




लढ्याचा गौरव आहे. हा पुरस्कार केवळ एका व्यक्तीचा नसून, लोकशाही मूल्ये, पारदर्शकता आणि उत्तरदायित्वासाठी लढणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा हा सन्मान आहे. हा सन्मान स्वीकारताना त्यांनी लोकशाही ही जपावी लागणारी प्रक्रिया असून ती आपोआप टिकत नाही, असा सूचक इशारा दिला.

लोकशाही ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नसून, सतत जागरूक, प्रश्न विचारणाऱ्या आणि मूल्यांशी बांधील असलेल्या नागरिकांवर ती उभी असते, असे भूषण यांनी अधोरेखित केले. लोकशाहीच्या रक्षणाची जबाबदारी फक्त न्यायालये किंवा संस्था यांची नसून, ती प्रत्येक नागरिकाची आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सृष्टी दिपक श्रृंगारे या चिमुकलीने मानवतेवर आधारित सुंदर गाणी सादर केली. ड. मनोहरराव गोमारे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण

### ॲड. मनोहरराव गोमारे पुरोगामी मंच तर्फे ॲड. प्रशांत भूषण यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

करून अभिवादन झाल्यानंतर वडाच्या झाडाला उपस्थित पाहुण्यांनी पाणी घालून कार्यक्रमाचे प्रतिकात्मक उद्घाटन केले. नंतर नुकतेच दिवंगत झालेले समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त बाबा आढाव व लोकसभेचे माजी सभापती व लातुरचे सुपूत्र शिवराज पाटील चाकुरकर यांना, दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली वाहण्यात आली.

त्यानंतर ॲड. प्रशांत भूषण यांना ॲड. मनोहरराव गोमारे राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ शिक्षणतज्ञ व माजी खा. जर्नादन वाघमारे यांच्या हस्ते त्यांना शाल, मानपत्र, सन्मानचिन्ह व रोपटे तसेच पन्नास हजार रूपये देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर लातुरचे खा. डॉ. शिवाजीराव काळगे, राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष वारे, प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, अंनिसचे राज्याध्यक्ष माधव बावगे व पुरोगामी विचारमंचचे समन्वयक डॉ. गणेश गोमारे उपस्थित होते.

यावेळी राष्ट्र सेवा दलाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष वारे व लातूरचे खा. डॉ. शिवाजीराव काळगे यांनी आपले विचार मांडले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरु डॉ. जर्नादन वाघमारे यांनी अध्यक्षीय समारोप केला. ॲड. उदय गवारे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन पर्णवी ढवारे व रुकसाना मुल्ला यांनी केले.

# मुकुंदराज माध्यमिक विद्यालयात बालविवाहमुक्त भारत अभियान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** बालविवाहमुक्त भारत अभियान अंतर्गत केंद्र शासनाचे महिला व बाल विकास मंत्रालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या जागरूकता, आधार, मदत व कृती मोहिमेअंतर्गत लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका यांच्या मार्गदर्शनाखाली जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्यंकटेश गिरवलकर, मुकुंदराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे कार्यकारी संचालक प्रा. तेजस कराड, मुख्याध्यापक एस.जी. मुंडे, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी धम्मानंद कांबळे, चाईल्ड लाईनचे जिल्हा समन्वयक बापू सुर्यवंशी, सहायक पोलीस निरीक्षक तथा दामीनी पथक प्रमुख आरती पवार, शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर ढमाले, विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी, पालक यावेळी उपस्थित होते. तसेच न्यायरक्षक कार्यालयाचे ॲड. ए.जे. तिवारी, ॲड. सुमेधा शिंदे, ॲड. एस. व्ही. सलगरे, ॲड. ए.बी. कलशेट्टी तसेच अधिकार मित्र पार्वती सोमवंशी यांचीही यावेळी उपस्थिती होती.

# डॉ.अर्चना पाटील चाकूरकरांच्या हस्ते सुप्रभात ग्रुपच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** लातूर येथील सुप्रभात फाउंडेशनद्वारा संचालित सुप्रभात ग्रुपच्या वतीने काढण्यात आलेल्या दिनदर्शिकेचे प्रकाशन रविवारी दुपारी भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दिनदर्शिका प्रकाशनाचा हा सोहळा अंबाजोगाई रोडवरील हॉटेल वन अँड ओन्ली या ठिकाणी पार पडला. यावेळी झरी (बु.) चे सरपंच दयानंद सुरवसे, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती.

या कार्यक्रमात डॉ. अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते सुप्रभात ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष मोहन गंगाधरप्पा रासुरे, अध्यक्ष राजकुमार मनोहर मस्के यांचा सपत्नीक सत्कारही करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपण बसवेश्वरांचे पाईक आहोत, कर्म हीच पूजा समजून चालतो असे सांगितले. स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांनी समाज कार्याला सर्वतोपरी महत्व देण्याची शिकवण दिल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्तविक दत्तात्रय स्वामी बसपुरे यांनी केले. कार्यक्रमास रुद्राली पाटील चाकूरकर, सुप्रभात ग्रुपचे कार्याध्यक्ष सिद्रामप्पा वाघमारे, उपाध्यक्ष बाबुराव पाचंगे, बाबा गायकवाड, शिवाप्पा टेंकाळे , सचिव देविदास घोडके, नागनाथ काकनाळे, अशोक जाधव, द्वारकादास बिदादा आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनेराव बेलुरे यांनी तर आभार प्रदर्शन शिवशंकर सुरवसे यांनी केले.

# उद्योगांना महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलने नवी ऊर्जा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** राज्यातील ४ लाख ४८ हजार उच्चदाब व लघुदाब औद्योगिक वीजग्राहकांना महावितरणकडून जागतिक दर्जाची तत्पर वीजसेवा देण्याची प्रक्रिया ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलमुळे अतिशय पारदर्शक व वेगवान झाली आहे. उद्योगांना वाढीव वीजभाराच्या मागणीनुसार सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध होण्यासोबतच विविध प्रश्र्न व तक्रारी सोडविण्याचा वेगही वाढला आहे. यासह महावितरणसोबतच २४७ थेट संवाद साधण्यासाठी या पोर्टलद्वारे राज्यातील २७८ औद्योगिक संघटना 'कनेक्टेड' झाल्या आहेत.

दरम्यान ऑनलाइन पोर्टलसह औद्योगिक संघटना व वीज ग्राहकांसोबत स्थानिक अधिकाऱ्यांच्या बैठकांसह महावितरणच्या थेट मुख्यालयातून संचालक व कार्यकारी संचालक स्तरावर व्हीडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे स्वतंत्र बैठका घेण्यात येत आहेत. विशेष म्हणजे वीजपुरवठा, नवीन वीजजोडणी, बिलिंग व इतर मुद्यांबाबत औद्योगिक संघटना व ग्राहकांनी मांडलेल्या प्रश्नांच्या निराकरणासाठी महावितरणने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल माहितीसाठी या पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. आतापर्यंत १२४ कार्यपूर्ती अहवाल अपलोड करण्यात आले आहेत. पोर्टलद्वारे व बैठकांमध्ये प्राप्त झालेल्या विविध २४२ पैकी २१५ तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात आले तर ऊर्वरित २७ प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन वीजयंत्रणा उभारण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यभरातील लघु व उच्चदाब औद्योगिक वीजग्राहकांसह विविध औद्योगिक संघटनांकडून महावितरणच्या ऑनलाइन 'स्वागत सेल' पोर्टलचे स्वागत होत आहे. नियमित संवादासह वीजसेवेचे विविध प्रश्न व मागण्या ताबडतोब मार्गी लागत असल्याने औद्योगिक ग्राहकांच्या वीजसेवेला महावितरणच्या ऑनलाइन पोर्टलमुळे नवी ऊर्जा मिळाली आहे.

# आठव्या बौध्द धम्म परिषदेची जय्यत तयारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** बौध्द धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरीटेबल ट्रस्ट तथा सर्व उपासक-उपासिका यांच्या सौजन्याने भिक्खू डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली होऊ घातलेल्या आठव्या अ. भा. बौध्द धम्म परिषदेची जय्यत तयारी महाविहार, धम्म संस्कार केंद्र, सातकर्णी नगर, रामेगाव ता. जि. लातूर येथे करण्यात आली आहे.

दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी रोजी संपन्न होणाऱ्या एक दिवशीय धम्म परिषदेच्या सभा मंडपाचे रोपन लातूर ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबराव नरवाडे, उप अभियंता इंजि. संजय सावंत, सरपंच साधना पांडुरंग मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी भंते बोधीराज, डॉ. सुधाकर गुळवे, डी. एस. नरसिंगे, प्रा. डॉ. संजय गवई, डी. एस. नरसिंगे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, विठ्ठल जाधव, प्रा. मा. ना. गायकवाड, प्रा. देवदत्त सावंत, पांडुरंग अंबुलगेकर, भीमराव चौदंते, जि. एस. साबळे, आर.एस. सोनकांबळे, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, ज्योतीराम लामतुरे, राजेश कदम, कुमार सोनकांबळे, सुधाकर कांबळे, पंडित महालिंगे, कुणाल शृंगारे, मधुकर शृंगारे, अन्तेश्र्वर थोटे, संतोष कसबे, नवनाथ कांबळे, विलास घारगावकर, सतीश मस्के, बनसोडे, विशाल वाहुळे, सतीश कांबळे, बालाजी धायगुडे, मिलिंद धावारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या एक दिवशीय संपन्न होणाऱ्या आठव्या बौध्द धम्म परिषदेस लातूर शहर व जिल्ह्यातील सर्व बौध्द उपासक उपासिकांनी हजारोच्या संख्येने पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून उपस्थित राहून धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिषदेचे संयोजक भिक्खू पय्यानंद थेरो यांनी सभामंडप रोपन कार्यक्रम प्रसंगी केले आहे.

# आ. देशमुख यांनी साधला पदाधिकारी-नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २२ डिसेंबर :** आ. अमित देशमुख यांनी सोमवारी सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, नागरिक यांच्या भेटी घेत संवाद साधला. लातूर शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीसाठी इच्छुक पदाधिकारी यांच्याशी निवडणुकी संदर्भात यावेळी चर्चा केली. यावेळी खा. डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव, माजी महापौर प्रा. स्मिता खानापुरे, ॲड. दीपक सुळ, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा. चेअरमन ड.समद पटेल, सुनील बसपुरे, कैलास कांबळे, सुपर्ण जगताप, सिकंदर पटेल, लायक पटेल, सुधीर गोजमगुंडे, यूनूस शेख, मंगेश वैरागे, निर्मल वैरागे, चंद्रकांत धायगुडे, विष्णू धायगुडे, बाबा पठाण, महेश काळे, सत्यवान कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सीसीआय केंद्र सुरू करण्याच्या मागणीसाठी शिवसेनेचा रास्ता रोको

## सीसीआयच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची एसआयटी चौकशी करण्यात यावी : आ. सत्तार

**तभा. वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि. २२ :** शेतकऱ्यांच्या कापसाला शासकीय हमीभाव मिळावा आणि सिल्लोड तालुका जिनिंग प्रेसिंग येथे तातडीने कापूस खरेदी केंद्र सुरून सीसीआयच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावीत, या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने आज सिल्लोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. कापसाला योग्य दर मिळत नसल्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप करावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

यावेळी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सीसीआयच्या अडमुठी धोरण व भ्रष्ट अधिकाऱ्यां विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. जोपर्यंत खरेदी केंद्र सुरू होत नाहीत, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा इशारा देण्यात आला. दलाल हटवा, शेतकरी वाचवा. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करा, शेतकऱ्यांचा माल हमीभावाने खरेदी करा अशा घोषणा आंदोलनात देण्यात आल्या. आंदोलनामुळे छत्रपती संभाजीनगर, जळगाव महामार्गावर दुतर्फा वाहतूक ठप्प झाली होती.

दरम्यान संतप्त शेतकऱ्यांनी

### सिल्लोडमध्ये संतप्त शेतकऱ्यांनी सीसीआयच्या विरोधात कापसाची केली होळी

आंदोलनात आणलेला कापूस जाळून निषेध व्यक्त केला. मागण्या मान्य न झाल्यास शेतकऱ्यांच्या हितासाठी हा लढा अधिक तीव्र केला जाईल असे आंदोलकांनी सांगितले.

या आंदोलनात माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार देखील उपस्थित होते. विधानसभेत तारांकित प्रश्नाचे उत्तर देतांना मुख्यमंत्र्यांनी सिल्लोडला सीसीआय केंद्र सुरू करण्याचे सांगितले त्यानंतर देखील सीसीआय केंद्र सुरू न झाल्याने सीसीआयच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची एसआयटी चौकशी करण्यात यावी तसेच सिल्लोड येथील तालुका सहकारी जिनिंग मध्ये हमीभावाने कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी आमदार अब्दुल सत्तार यांनी केली. सदरील मागणी तातडीने मान्य न झाल्यास याहून अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा आमदार अब्दुल सत्तार यांनी दिला.




शेतकऱ्यांच्या हितासाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे आमदार अब्दुल सत्तार यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी शिवसेनेचा कायम पुढाकार राहिला आहे असे स्पष्ट करीत शेतकऱ्यांना पीकविमा मिळावा ही आमची मागणी आहे. पीकविमा बाबत सकारात्मक विचार व्हायला हवा नसता त्यासाठी आंदोलन उभारले जाईल असा इशारा आमदार अब्दुल सत्तार यांनी यावेळी दिला.

यावेळी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांनी आंदोलनस्थळी भेट देवून निवेदन स्वीकारले. आंदोलकांच्या मागण्या शासनाकडे पाठवून याबाबत पाठपुरावा करण्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी आंदोलनात नवनिर्वाचित नगराध्यक्ष अब्दुल समीर, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा. गाढे, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, कृउबा समितीचे सभापती विश्वास गाढे, उपसभापती संदीप राऊत, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, देविदास लोखंडे, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शहरप्रमुख मनोज झंवर, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, कृउबा समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, दामूअण्णा गव्हाणे, जयराम चिंचपुरे, नानासाहेब रहाटे, शेख जावेद, प्रताप प्रसाद, देविदास पालोदकर, तालुका सहकारी जीनिंगचे चेअरमन गणेश गरुड, व्हाईस चेअरमन अनिस पठाण, रमेश साळवे, संजय डमाळे, राजूबाबा काळे, राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, अक्षय मगर, विठ्ठल सपकाळ, शेख सलीम, रउफ बागवान, हनिफ मुलतानी, शंकरराव खांडवे, शेख इम्रान, सुनील दुधे, अकिल वसईकर, सुधाकर गायकवाड, दीपक सोनवणे, डॉ. फेरोज खान, सत्तार हुसेन, अशोक कांबळे, अक्रम देशमुख, प्रमोद शिंदे, सुधाकर पाटील, संदीप मानकर, फहिम पठाण आदींसह तालुक्यातील शेतकरी, शिवसेना पदाधिकारी - कार्यकर्ते उपस्थित होते.

# थोडक्यात...

## भगवती विद्यालय येथे राष्ट्रीय गणित दिवस साजरा



**बिडकीन दि २२ डिसेंबर :** राष्ट्रीय गणित दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक रायभान रक्ते यांनी दिग्गज गणित तज्ञ् रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरवात केली. रामानुजन यांच्या जीवनावर कमलाकर काळे व रामनाथ धनवे यांनी बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. मुख्याध्यपकांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना रामानुजन यांचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीधर जऱ्हाड यांनी तर आभार सुनील पवार यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अप्पासाहेब किसवे, श्रीमती विश्रांती सलगरे, आशुतोश झारगड, सुभाष राठोड यांनी सहकार्य केले पसायदानणे कार्यक्रमाची सांगता झाली.

## 'मर्दिनी' २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीस

**छत्रपती संभाजीनगर :** श्रेयस तळपदे आणि फ्लुएन्स मोशन पिक्चर्स प्रा. लि. प्रस्तुत आगामी मराठी चित्रपट 'मर्दिनी' चा मुहूर्त शॉट नुकताच पार पडला. प्रत्येक स्त्रीच्या सामर्थ्याची आणि सहनशक्तीची कथा मांडणारा हा चित्रपट सामाजिक आशयासह मनोरंजन देणारा ठरणार आहे. चित्रपटात प्रार्थना बेहेरे, अभिजीत खांडकेकर, जितेंद्र जोशी, राजेश भोसले तसेच बालकलाकार मायरा वैकुळ यांच्या भूमिका आहेत. दिग्दर्शक अजय मयेकर यांचे हे दिग्दर्शन क्षेत्रातील पदार्पण असून, निर्मिती दीप्ती तळपदे यांनी केली आहे. 'मर्दिनी' २०२६ साली मोठ्या पडद्यावर प्रदर्शित होणार आहे.

## संगीता बालचंद्रन गायत्री देवीच्या भूमिकेत

**संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है २.०' २२ डिसेंबरपासून एण्ड टीव्ही आणि हिंदी झी ५ वर सुरू होत आहे. मालिकेच्या सिग्नेचर विनोदाच्या नवीन डोससह हास्य, मोहकता व विलक्षण मनोरंजनाचा आनंद देईल. जेथे प्रेक्षकांना मनमुराद मनोरंजन मिळेल. या मनोरंजनपूर्ण राइडमध्ये सामील होत आहेत प्रतिभावान संगीता बालचंद्रन, ज्या मालिकेमध्ये मनमोहन तिवारीची (रोहिताश्व गौड) मावशी (मौसी) गायत्री देवीची भूमिका साकारताना पाहायला मिळेल. गायत्री देवी प्रबळ, स्वावलंबी आणि आधुनिक महिला आहे, जिने परदेशी व्यक्तीसोबत विवाह केला होता, ज्यामुळे तिच्या कुटुंबाने तिच्यासोबत सर्व नाते तोडले होते. आपल्या भूतकाळाला विसरत ती आत्मविश्वासू व प्रगतीशील आहे, तसेच तिचा विश्वास आहे की प्रत्येक महिला साक्षर व सक्षम असली पाहिजे, ज्यामुळे ती स्वत:हून निर्णय घेऊ शकते.

## वडिलांच्या इंडस्ट्रीप्रती आवडीतूनच अभिनयाचा प्रवास सुरू : सीरत कपूर

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील आगामी विनोदी मालिका 'घरवाली पेडवाली' मध्ये सावीची भूमिका साकारणारी अभिनेत्री सीरत कपूर अभिनयाच्या वातावरणातच मोठी झाली आहे. वडील संदीप कपूर यांना इंडस्ट्रीप्रती असलेल्या आवडीतूनच तिच्या अभिनय प्रवासाला सुरुवात झाल्याचे तिने सांगितले. सीरतने वयाच्या पाचव्या वर्षी मॉडेलिंगला सुरुवात केली. त्यानंतर तिने टीव्ही व प्रिंट जाहिरातींमध्ये काम केले असून, तिच्या पहिल्या टीव्ही जाहिरातीचे शूटिंग बांगलादेशमध्ये झाले होते. शिक्षणाला प्राधान्य देत अभिनयाकडे वळलेली सीरत आज दूरदर्शनवर महत्त्वाची भूमिका साकारत असून, तिचा प्रवास प्रेरणादायी ठरत आहे.

## सिल्लोडच्या विजयाचा सोयगावात शिंदे सेनेचा जल्लोष

**सोयगाव :** सिल्लोड नगर परिषदेच्या नगराध्यक्ष पदी शिवसेना(शिंदे गट) अब्दुल समीर यांच्या विजयाचा रविवारी ४ वाजता सोयगावात शिवसेना शिंदे गट वतीने शिवसेना भवन सोयगाव व शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाक्याची आतशबाजी करून मिठाई वाटुन आंनद साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना सोयगाव शहरप्रमुख तथा नगरसेवक संतोष बोडखे, गटनेते अक्षय काळे, हर्षल काळे, रऊफ शेख, लतीफ शहा, गजानन कुडके, किशोर मापारी, राजु दुतोडें, संदिप सुरडकर, मोतीराम पंडीत, रमेश गंव्हाडे, विक्रम चौधरी, संदीप चौधरी, आमोल मापारी, भगवान वाघ आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

## बाई-काकाजी पॉलिमर्स लिमिटेडने १०५.१७ कोटींचा आयपीओ लॉंच केला

**लातूर :** पीईटी प्रीफॉर्म्स आणि स्पेशल क्लोजरच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या बाई-काकाजी पॉलिमर्स लिमिटेडने बीएसईच्या एसएमई प्लॅटफॉर्मवर त्यांचा प्रारंभिक सार्वजनिक ऑफरिंग (आयपीओ) जाहीर केला आहे. हा आयपीओ मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी उघडेल आणि शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ रोजी बंद होईल. इश्यू किंमत पट्टा १७७ ते १८६ प्रति इक्विटी शेअर असा निश्चित केला आहे, ज्याचे दर्शनी मूल्य १० आहे. ही सार्वजनिक ऑफरिंग ५६,५४,४०० इक्विटी शेअर्सची पूर्णपणे नवीन इश्यू आहे, जी वरच्या किंमत पट्ट्यावर एकूण १०५.१७ कोटी इतकी आहे. हा इश्यू १००% बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारे केला जात आहे आणि त्यात विक्रीसाठी कोणताही ऑफर (ओएफएस) समाविष्ट नाही. हे इश्यू बुक रनिंग लीड मॅनेजर म्हणून हेम सिक्युरिटीज लिमिटेड द्वारे व्यवस्थापित केले जात आहे, तर मशिताला सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड इश्यूचे रजिस्ट्रार आहे. कंपनीचे इक्विटी शेअर्स बीएसई एसएमई प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांमध्ये भाजप पुन्हा नंबर १ चा पक्ष

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे विकासाभिमुख राजकारण व भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचे संघटन कौशल्य आणि अचूक निवडणूक नियोजन यांच्या जोरावर भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक निकालात अभूतपूर्व असे यश मिळवले आहे. महाराष्ट्रातील भाजपा कार्यकर्त्यांच्या मुखातून देवेंद्र आणि रविंद्र या जोडगोळीचा नेहेमी होणार आदरार्थी उल्लेख आजच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निकालांनी आज सार्थ ठरवला. यंदाच्या निवडणुकीत प्रचारगीतातून गाजलेले तुमची आमची भाजपा सर्वांची हे बोल महाराष्ट्रातील जनतेने खरे करून दाखवले, हे या निकालावरून सिद्ध झाल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. रविंद्र चव्हाण यांनी सहा महिन्यांपूर्वी प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा हाती घेतल्यानंतर अतिशय शिस्तबद्धपणे आणि संयम व आक्रमकपणाच्या अनोख्या शैलीतून महाराष्ट्र पिंजून काढला. यादरम्यान अनेक दिग्गज नेते त्यांनी भाजपात आणले. कोकणात वर्चस्व असलेल्या रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाचा खरंतर या निवडणुकांच्या निमित्ताने कस लागला, त्यात रविंद्र चव्हाण पैकीच्या पैकी गुणांनी उत्तीर्ण झाल्याचे आज स्पष्ट झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चातुर्यामुळे आणि रविंद्र चव्हाण यांच्या संघटन कौशल्यामुळे अनेक ठिकाणी लढत जिंकली.

# पैठणचा बालेकिल्ला पुन्हा शिवसेनेकडे

**तभा.वृत्तसेवा**

**पैठण, दि. २२ :** पैठण नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना (शिंदे गट) नं विरोधकांचा सपशेल पराभव करत पुन्हा एकदा शहरावर आपली पकड मजबूत केली आहे. नगराध्यक्ष पदावर शिवसेनेच्या विद्या भूषण कावसणकर या मोठ्या मताधिक्यानं निवडून आल्या असून, हा निकाल म्हणजे शिवसेनेच्या ताकदीवर शहरानं टाकलेली मोहरच मानली जात आहे.

एकूण २५ नगरसेवक पदांपैकी शिवसेना (शिंदे गट) नं

### ; नगरपरिषदेत भगवा डौलानं फडकला

तब्बल १७ जागा जिंकत एकहाती वर्चस्व निर्माण केलं हाय. मित्र पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) नं आपल्या वाट्याच्या दोन्ही जागा जिंकून युतीला भक्कम साथ दिली. त्यामुळे शिवसेना-राष्ट्रवादी युतीनं एकूण १९ जागांवर दणदणीत विजय मिळवला हाय.

विरोधी पक्षांची अवस्था फारशी दमदार दिसली नाही. काँग्रेसला ४ जागांवर समाधान मानावं लागलं, भाजपला केवळ १ जागा मिळाली, तर उबाठा गटालाही फक्त १ जागेवरच यश आलं. काही ठिकाणी अपक्ष उमेदवार निवडून आले असले, तरी नगरपरिषदेतील सत्तासमीकरणावर त्यांचा फारसा परिणाम झाला नाही. या निकालामुळं पैठण नगरपरिषदेत शिवसेना-राष्ट्रवादी युतीची सत्ता ठाम झाली असून, पुढील काळात शहराच्या विकासाच्या निर्णयांवर याच गटाचं वर्चस्व राहणार, हे स्पष्ट झालं हाय. निकाल जाहीर होताच खासदार संदीपान भुमरे आणि आमदार विलास बाप्पू भुमरे यांच्या उपस्थितीत विजयी उमेदवारांची मिरवणूक काढली.



**छत्रपती संभाजीनगर :** गायकवाड ग्लोबल स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात वंदे मातरम् हॉल येथे तिसरीत शिकणाऱ्या वीर शंकर साबळे याने साकारलेली विठ्ठलाची सुरेख वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.



# जवाहर कॉलनीमध्ये भागवत कथेला प्रारंभ

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ :** सध्या कलियुगाचा प्रारंभ काल सुरू आहे. यात मनुष्यजीवनात अनेक क्लेश, दुःख निर्माण झाले आहेत. मनुष्यजीवनात मनावर, इंद्रियांवर ताबा राहत नाहीये. मन स्वाभाविकपणे दुष्कर्त्यांकडे ओढले जाते आहे. अशावेळी जीवनात पुन्हा भक्तिभाव निर्माण व्हावा, आनंद आणि समाधान निर्माण व्हावे यासाठी भागवत महापुराणातील कथांचे श्रवण, मनन अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन श्री गणेशबुवा रामदासी यांनी आज (दि. २१) रोजी केले.

गारखेडा परिसरातील जवाहर कॉलनीमधील श्री ऋणमोचन गणेश तसेच संकट मोचन हनुमान संस्थान, जवाहर सहकारी

### पाद्यपूजा, भव्य शोभायात्रेचे आयोजन; बचावासाठी भागवताचे श्रवण, मनन अत्यावश्यक : श्री गणेशबुवा रामदासी

गृहनिर्माण संस्था आणि श्री कुलस्वामिनी महिला मंडळ यांच्या वतीने सात दिवसाचे रोज दुपारी ३ ते सहा श्री भागवत कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे पहिले पुष्प आज महाराजांनी गुंफले.

आपल्या रसाळ वाणीतून, विविध दृष्टांताचा आणि व्यावहारिक प्रसंगांचा आधार घेत महाराजांनी भागवत कथेला प्रारंभ केला. भगवंतांच्या नामस्मरणाचे महत्व सांगताना त्यांनी ते साधे, सोपे आणि परिपूर्ण असल्याचे सांगत ही संपत्ती सतत वाढणारी आणि आनंद देणारी असल्याचे ते म्हणाले.

याउलट स्थावर आणि जंगम मालमत्ता ही सतत घटणारी, काळजी निर्माण करणारी आहे. जेथे रामनामाचे सतत स्मरण हे अशुभ काही राहातच नाही असेही ते म्हणाले.

बुद्धी ही भगवंताने दिलेली अशी देणगी आहे, त्याद्वारे आम्ही घरात चैतन्य, आनंद आणि समाधान आणू शकतो. शांती, सुख समाधान आणि चैतन्य आणण्यासाठी भागवत महाकथेचे श्रावण, मनन अत्यावश्यक आहे असेही म्हणाले.

# उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांची अनुपस्थिती गंभीर: प्रा. अनिल राव

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाढती अनुपस्थिती ही उच्च शिक्षण व्यवस्थेसमोरील गंभीर समस्या असून, त्यावर मूलभूत बदलांची गरज असल्याचे मत अनुपस्थिती सर्वेक्षणासाठी गठीत तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल राव यांनी व्यक्त केले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) देवगिरी प्रदेशाच्या वतीने मराठवाडा व खान्देश स्तरावर करण्यात आलेल्या शास्त्रशुद्ध सर्वेक्षणाचा अहवाल यावेळी प्रसिद्ध करण्यात आला.

कोविड-१९ नंतर विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन उपस्थिती मोठ्या प्रमाणात घटली असून, त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्ता, मानसिक स्वास्थ्य व सामाजिक विकासावर होत असल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. दीर्घकाळ ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष शैक्षणिक वातावरणाशी संपर्क कमी झाला असून, सह-अभ्यासक्रम, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांतील सहभाग घटल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे.

या सर्वेक्षणात विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक व विद्यापीठ अधिकारी अशा




सहा प्रमुख घटकांचा सहभाग घेण्यात आला. प्रश्नावली व प्रत्यक्ष संवादाच्या माध्यमातून माहिती संकलन करण्यात आले.

या अहवालाच्या आधारे राज्यभर जनजागृती मोहिमा राबविण्यात येणार असून, अहवाल महाराष्ट्र शासन व विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सादर करण्यात येणार आहे. शासन, विद्यापीठे व महाविद्यालयांनी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन प्रदेश मंत्री वैभवी ढिवरे यांनी केले. यावेळी अभाविप देवगिरी प्रदेश अध्यक्ष प्रा. डॉ. सचिन कंदले उपस्थित होते.

# सोयगाव जि.प.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी ठोंबरे; उपाध्यक्षपदी गायकवाड

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २२ :** रोजी जिल्हा परिषद प्रशाला येथे पालकसभा सोमवार रोजी उत्साहात संपन्न झाली.यात दशसूत्री उपक्रम अंतर्गत शाळा स्तरावरील उपक्रमाचा आढावा घेण्यात आला व पुढील शाळा गुणवत्ता विकासाचे नियोजन यावर सखोल चर्चा करण्यात आली. पालक सभेतून शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आले.त्यात पुढील प्रमाणे अध्यक्षपदी सुनील ठोंबरे, तर उपाध्यक्ष भारती गायकवाड, सर्व सदस्य पदी ललित पंडित, रुपाली पाटील, उज्वला ढगे, वाल्मीक चव्हाण, भिला राठोड, अनिल




शिंदे, अनिता कोळी, शिक्षण प्रेमी अरुण सोहनी, स्वयं सेवी संस्था प्रतिनिधी कृष्ण जुनघरे, शिक्षक प्रतिनिधी भास्कर चौधरी, स्थानिक प्राधिकरण सदस्य नगरसेवक नगरपंचायत,विद्यार्थी प्रतिनिधी भावेश जाधव, चंचल राठोड व सचिव मुख्याध्यापक दादाराव राठोड याप्रमाणे शाळा व्यवस्थापन समिती एकमताने निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शाळा गुणवत्ता वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येईल असे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी यांनी मत व्यक्त केले. अरुण सोहनी यांनी पालक शिक्षक व शाळाविषयी मार्गदर्शन पार मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक दादाराव राठोड, सुखदेव पाटील, शिवाजी नवले, संतोष भारद्वाज, विद्याधर बागुल, संगीता सोनवणे, तुकाराम पायघन, जया वाघ, वैजनाथ सावळे, शिवराम आगे, सचिन ढगे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन भास्कर चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन राजेंद्र उंबरकर यांनी केले.

# पुणेकरांसाठी खास 'सेलिब्रेशन गाईड'

**पुणे :** वर्षातील सर्वात जादुई काळ जवळ येत असताना, पुणे शहर लखलखाट, उत्सव आणि उत्साही ऊर्जेने भारलेलं दिसत आहे. नाताळच्या सुरांनी निनादणारी ठिकाणं, उबदार वातावरण, झगमगती सजावट, थिरकणारे डान्स फ्लोअर्स आणि मध्यरात्रीचे रोमांचक काउंटडाउन-पुण्यातील ख्रिसमस आणि नववर्षाचा काळ म्हणजे मित्र-परिवारासोबत आनंद साजरा करण्याचा उत्सवच आहे. या नववर्षी बुकमायशो आपल्या खास मोहिमेद्वारे तुम्हाला असे संकल्प करण्याचं आवाहन करत आहे, 'जे तुम्ही खरंच पूर्ण करू शकाल'. संकल्प सोपे ठेवा: फक्त एकच असा संकल्प करा ज्यावर तुम्ही खरोखर ठाम राहाल.

**जाहीर प्रगटन/सायटेशन नोटीस**

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं.८५६/२०२५ प्रकरणात पुढील तारीख ०२/०२/२०२६

अर्जदार :१)आसेफ लतीफ शेख वय ४३ वर्षे, धंदा मजूरी रा. नगरपालीका वसाहत, आंबेडकर चौक, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) जाकेरा सरवर शेख वय -४५ वर्षे, धंदा- घरकाम रा. लक्ष्मी कॉलनी, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद.

//विरुद्ध//

गैरअर्जदार. - निरंक

प्रकरण : भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे वारस प्रमाणपत्र / सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबाबत अर्ज.

गंगापूर.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. असरार सी. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत भारतीय वारस कायदा १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र/ सक्सेशन सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ व २ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणार असून अर्जदार क्रं. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्रं. १ व २यांचे वडील नामे में लतीफ म हानीफ जहूरी दिनांक ०७/०६/२०२५रोजी वृध्दपकाळाने राहत्या घरी मौजे ता. गंगापूर, जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ व २ यांची आई नामे सहीदा बेगम मोहम्मद लतीफ जहूरी या दिनांक ०३/०१/२००१ रोजी वृध्दपकळाने राहत्या घरी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयत म लतीफ में हानीफ जहूरी यांना अर्जदार क्रं. १ हा मुलगा व अर्जदार क्रं. २ विवाहीत मुलगी असून मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदारांचे वडील मयत म लतीफ म हानीफ जहूरी यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा गंगापूर ता. गंगापूर येथील बचत खाते क्र. ५२१५११६७५५२ मध्ये रक्कम रूपये ७६,१४७,५८/- (अक्षरी शहात्तर हजार एकशे सत्तेचाळीस रूपये अठ्ठावन्न पैसे मात्र) जमा असलेली संपुर्ण रक्कम व्याजास अर्जदारांच्या नावे मिळण्यासाठी संबंधीत बँक अधिकारी यांना मागणी केली असता त्यांनी मयत म लतीफ म हानीफ जहूरी यांचे वारस प्रमाणपत्र/सक्सेशन सर्टिफिकेटची मागणी केली असल्यामुळे सदर अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र/सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**आदेशावरून**
**लिपीक सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## अग्रलेख...

# ‘धुरंधर’ भाजपाचा दिग्विजय

राजकारणात निवडणुकीचे मोठे महत्त्व असते. निवडणुकीच्या माध्यमातून सत्तेची दारे उघडत असतात आणि सत्ता हा असा गुलाबजाम असतो की, शुगर कितीही वाढणार असली तरी तो कुणालाच सोडवत नाही. त्यामुळेच सारे राजकीय पक्ष, त्यांचे नेते, कार्यकर्ते प्रत्येक निवडणुकीत हिरिरीने उतरतातच. लोकशाहीत हे अपेक्षितच आहे. विजय अपेक्षित असतो, तसा पराभवही अपेक्षित असतो. नगर पालिका आणि नगर पंचायतींची निवडणूक धामधुमीत झाली. महाराष्ट्रात प्रदीर्घ काळ प्रतीक्षा केल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू झाल्या आणि आजच्या निकालांनी त्यांचा पहिला टप्पाही पार पडला. पहिला टप्पा होता नगर पालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांचा. २४६ नगर पालिका आणि ४२ नगर पंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी दोन टप्प्यांत मतदान झाले आणि त्यांचा निकाल २१ डिसेंबरला लागला. बहुतांशी निकाल तसे अपेक्षितच आहेत. भाजपा सर्वांत मोठा पक्ष ठरला. सर्वाधिक नगरसेवक, नगराध्यक्ष भाजपाचेच निवडून आले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि दुसरे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी त्याखालोखाल चांगली कामगिरी केली आहे. एकुणात भाजपासह महायुतीची कामगिरी उत्तमच म्हटली पाहिजे. त्या तुलनेत महाविकास आघाडीची कामगिरी अत्यंत निराशाजनक आहे. मनात आणले तर महाविकास आघाडीतील घटक पक्षांसाठी ही आणखी एक आत्मपरीक्षणाची संधी आहे. राज्याच्या निवडणूक आयोगाने २८८ नगर पालिका व नगर पंचायतींचा कार्यक्रम गेल्या ४ नोव्हेंबरला जाहीर केला होता. २ डिसेंबर रोजी पहिल्या टप्प्याचे मतदान झाले. त्यात २६३ स्थानिक स्वराज्य संस्थांचे भविष्य पेटीत बंद झाले होते. दुसऱ्या टप्प्यात, २० डिसेंबरला उर्वरित स्थानिक संस्थांसाठी मतदान झाले. तसेच दीडेकशे सदस्यांच्या जागांसाठीही मतदान झाले. त्या साऱ्यांचा आज निकाल लागला. या निकालांचे एका वाक्यात वर्णन करायचे तर ‘धुरंधर’ ठरलेल्या भाजपाच्या दिग्विजयासह महायुतीची मैफिल या निकालांनी आणखी बहरलेली असताना काँग्रेससह महाविकास आघाडीला अद्याप सूर गवसलेला नाही, असेच करावे लागेल.

घराणेशाहीचा विषय अनेक ठिकाणी होता. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होत्या. काही ठिकाणी प्रचंड चुरस होती. त्या-त्या ठिकाणी मतदारांनी आपापला कौल दिला आणि निकालातून आपल्या मनातले दाखवून दिले. सर्वपक्षीय घराणेशाहीवादी नेत्यांचा मुखभंग काही ठिकाणी झाला, तर अनेक ठिकाणी घराणेशाहीविरोधी प्रचाराचा विचार न करता लोकांनी प्रस्थापित कुटुंबातील व्यक्तींना निवडूनही दिले. त्याला स्थानिक समीकरणे कारणीभूत होती. परंतु, एकुणात हा निकाल म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुतीवर निमशहरी भागांचा विश्वास असल्याचे सांगणारा आहे. महाविकास आघाडी ही महायुतीची सशक्त विरोधक म्हणून नजीकच्या काळात उभी राहू शकणार नाही, हेही या निकालाने सांगितले आहे. महायुतीमधील एकवाक्यता आणि महाविकास आघाडीतील गोंधळ यातूनच या निवडणुकीत काय घडणार आहे ते लक्षात आलेच होते. अपेक्षेप्रमाणेच घडले. गतवर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. त्यानंतर सहाच महिन्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र महाविकास आघाडीची प्रचंड घसरण झाली. लोकसभा निवडणुकीतील कौलामुळे महाविकास आघाडीला अहंगंडाने पछाडले होते. आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद आपल्याकडेच येणार असा वृथा विश्वास महाविकास आघाडीला वाटू लागला होता. आघाडीतील घटक पक्ष विधानसभेच्या वेळी बेसावध राहिले आणि लोकसभेच्या झटक्याने सावध झालेल्या महायुतीने विधानसभा निवडणूक जिंकली. महायुतीने पुढेही सावध पवित्रा कायम ठेवला. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर व त्यासाठीच्या हालचालींवर नजर ठेवली. त्यासाठी पूर्वतयारी केली आणि अखेर ही निवडणूक सुद्धा महायुतीने जिंकली. यातील प्रमुख योगदान भाजपाचे. त्याखालोखाल कामगिरी आहे दोन उपमुख्यमंत्र्यांच्या पक्षांची. महाविकास आघाडीतील काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना हे तिन्ही घटक पक्ष अजिबात चमक दाखवू शकले नाहीत. एकेक टापू, एकेक शहर अशी काही नेते वा पक्षांची छाप दिसते, पण राज्याच्या पातळीवर भाजपाखेरीज इतर कुणाचीही छाप नाही. राज्याच्या पातळीवर एकमेव उठून दिसणारे यश आहे ते भाजपाचे आणि ते यशच मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करणारे आहे. आता नवे वर्ष उजाडल्याबरोबरचा पंधरवडा महानगर पालिका निवडणुकीच्या धामधुमीचा असेल. त्यानंतर जिल्हा परिषदांच्या निवडणुका होतील. एकुणात ग्रामीण, शहरी व निमशहरी अशा तिन्ही स्तरांचा कौल लवकरच स्पष्ट होणार आहे. त्या निवडणुकीतही भाजपाची कामगिरी उत्तम राहील, असे या निकालांचे सांगणे आहे. भाजपाची निवडणुकीतील कामगिरी नेहमीच उजवी असते याची काही कारणे आहेत. पहिली बाब अशी की, आता फक्त पक्षाच्या किंवा नेत्याच्या नावावर निवडणुका जिंकता येत नाहीत. अपवादात्मक ठिकाणी यश मिळेलही, पण व्यापक यश मिळविण्यासाठी पक्ष व नेते मातब्बर असले तरी उमेदवारही चांगले असावे लागतात. भाजपामध्ये या गोष्टींची नीट काळजी घेतली जाते. शंभर टक्के ठरविल्याप्रमाणे होत नसेलही, पण शंभर टक्के नियोजन केल्यावर सत्तर-ऐंशी टक्के या प्रमाणात ते प्रत्यक्षात उतरत असते. हा पक्ष कागदावर तयारी करतो आणि नेते-कार्यकर्त्यांना कामाला लावतो. जबाबदाऱ्यांचे वाटप करतो आणि कामांचा हिशेब मागतो. तसे अन्य कोणत्याही पक्षात घडत नाही. काँग्रेसच्या नेत्यांना आजही असे वाटत असते की, मोदी किंवा फडणवीस यांच्या विरोधात अँटिइन्कम्बन्सी असल्यामुळे विजय आपलाच आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला अद्याप साहेबांच्या जादूगार असण्यावर विश्वास आहे. आपली पुण्याई महाराष्ट्रात अजूनही चालेल असा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा समज आहे. वास्तवात असे काहीही घडत नसते. निवडणूक गंभीरपणे लढावी लागते आणि ते फक्त भाजपाच करते. महायुतीतील घटक पक्षांना थोडाफार त्या पक्षाचा कित्ता गिरवावा लागतो. त्याचा त्यांना अर्थातच फायदा होतो. दुसरे म्हणजे सत्तेत असतानाही सर्व निवडणुका जिंकण्याची ईर्ष्या ठेवणे अवघड असते. सत्तेतल्या लोकांना आपलीच सत्ता सर्व थरांत येईल, असा समज होणे स्वाभाविक असते. मात्र, भाजपा कधीही बेसावध राहत नाही. सत्तेत असो वा नसो, निवडणूक जिंकण्यासाठी हा पक्ष हिरिरीने झटतो. त्याचा फायदा भाजपाला होतो. सत्तेत नसलेल्यांनी अँटिइन्कम्बन्सी वगैरेची फँटसी बाजूला ठेवून दिली पाहिजे. गेल्या दशकभरात देशाचे आणि महाराष्ट्राचेही राजकारण बदलले आहे. तसे ते गावागावाचे आणि शहरांचेही बदलले आहे. गावे, छोटी नगरे आणि महानगरे या सर्व ठिकाणच्या नागरिकांच्या काही अपेक्षा आणि आकांक्षा आहेत. त्यांना प्रतिसाद देणारा नेता, पक्ष आणि तसे सर्वाधिक उमेदवार देणे ज्यांना जमेल, त्यांच्या पदरात जनता आपले माप टाकत असते. निमशहरी भागांतील या निवडणुकीचा निकाल एकीकडे सुशासनावर विश्वास टाकतानाच अधिकचे काही मागणाराही आहे. जिथे कुठे महायुतीला विजय मिळाला नसेल, तेथे काय चुकले याचा धांडोळा घेतला तर महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुकीत कामी येणारे मुद्दे सापडतील. आपल्या समस्या-प्रश्न सोडविले जाणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अनागोंदी संपविणे हे नागरिकांना-मतदारांना हवे आहे. हे काम केंद्रात व राज्यात सत्ता असलेला पक्ष म्हणजे भाजपा चांगल्या रीतीने करू शकतो, असा विश्वास दर्शवितानाच, अनेकानेक अपेक्षा ठेवून मतदारांनी महायुतीला हा कौल दिला आहे हेही समजून घेतले पाहिजे. विश्वास असेल तेथे अपेक्षा असतातच आणि अविश्वास दर्शविला गेला असेल तर अपेक्षाभंगाचे दुःख व्यक्त झालेले असते, एवढेसे गमक समजून घेतले तर निवडणुकीच्या लोकतांत्रिक अन्वयार्थाच्या तळाशी पोहोचणे कुणालाही कठीण नाही. पुढचे घोडामैदान तीन आठवड्यांवर आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पाकिस्तानला आता ‘एल-१६’ टॉनिक!

अमेरिका आणि चीन या दोन जागतिक महाशक्तींमध्ये जबर मतभेद असले तरी पाकिस्तानला शस्त्रसज्ज व युद्धसज्ज करण्याच्या मुद्यावर त्यांचे एकमत झालेले दिसते. अमेरिकन प्रशासनाने एका ताज्या निर्णयात पाकिस्तानला १५ हजार कोटी रुपयांची ‘एल-१६’ उपकरणे विकण्याचा की देण्याचा निर्णय घेतला आहे.


**एल-१६ प्रकरण :** अमेरिकेच्या लॉकहिड मार्टीन या प्रसिद्ध कंपनीने तयार केलेले हे उपकरण लढाऊ विमानांमध्ये वापरले जाते. लिंक- १६ म्हणजे एल-१६ या नावाने ओळखले जाणारे हे उपकरण लढाऊ विमानांना त्यांचे लक्ष्य शोधण्यास, त्याचा मागोवा घेण्यास व ते उद्ध्वस्त करण्यास मदत करते. विशेष म्हणजे हे उपकरण ‘जाम’ केले जाऊ शकत नाही.

**९२ संच :** अमेरिका पाकिस्तानला या उपकरणाचे ९२ संच पुरविणार आहे. पाकिस्तानी रुपयामध्ये या एका संचाची किंमत १६३ कोटी रुपये राहणार आहे. पाकिस्तानला याचा होणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे पाकिस्तानजवळ असलेल्या एफ-१६ विमानांचे आयुष्य १५ वर्षांनी वाढणार असून, आता ही विमाने २०४० पर्यंत पाकिस्तानी वायुदलाला वापरता येतील.

**७५ विमाने :** पाकिस्तानी वायुदळाजवळ एफ-१६ जातीची ७५ विमाने असून ती आता जुनी झाली आहेत. या सर्व विमानांमध्ये एल- १६ बसविल्यानंतर त्यांना नवसंजीवनी मिळणार आहे. अमेरिका-पाकिस्तान यांच्यातील करारानुसार पाकिस्तानला या विमानांचा वापर भारताच्या विरोधात करण्यास मनाई आहे. ही अटही राष्ट्रपती ट्रम्प शिथिल करू शकतात. त्यानंतर या विमानांचा वापर भारताविरुद्ध करण्यास पाकिस्तान मोकळा राहणार आहे.

**ऑपरेशन सिंदूर :** मे महिन्यात झालेल्या ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानने भारताच्या विरोधात एफ-१६ चा वापर केला नव्हता तर चिनी बनावटीची जेएफ थंडर १० व जेएफ १७ या दोन जातींच्या विमानांचा वापर केला होता. त्याच्यात बसविण्यात आलेल्या प्रक्षेपणास्त्रांची मारक क्षमता ३०० किलोमीटर एवढी होती. पाकिस्तानला एल-१६ मिळाल्यानंतर पाकिस्तानच्या हवाई मारक क्षमतेत निश्चितच वाढ होणार आहे.

**निर्णयाचा मुहूर्त! :** २०२१ पासून पाकिस्तान एल-१६ मिळविण्याचा प्रयत्न करीत होता. आता त्याला ते देण्याचा निर्णय ट्रम्प प्रशासनाने घेतला आहे. हा निर्णय आताच का घेण्यात आला? भारत-रशिया यांच्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या लष्करी कराराला अमेरिकेने दिलेले हे उत्तर असल्याचे मानले जाते. भारताने रशियाकडून कच्चे तेल आयात करणे बंद करावे अशी मागणी राष्ट्रपती ट्रम्प वारंवार करीत आहेत. ती मागणी मान्य न करता भारताने रशियाशी लष्करी करार केला. यावर अमेरिका नाराज



होणार हे अपेक्षित होते. ती नाराजी कशी व्यक्त होते हा फक्त मुद्दा शिल्लक होता. पाकिस्तानला एल-१६ देण्याचा निर्णय घेत अमेरिकेने भारताला आपल्या नाराजीचा पहिला संकेत दिला आहे. आजवर हे तंत्रज्ञान केवळ नाटो देशांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. नाटोत नसणारा, पण एल-१६ तंत्रज्ञान असणारा पाकिस्तान पहिला देश राहणार आहे. येणाऱ्या दिवसांत अमेरिका पाकिस्तानला मदत करणारे आणखी काही निर्णय घेईल असे मानले जाते.

**हवाई युद्ध :** भारत-पाकिस्तान यांच्यात जेव्हा केव्हा युद्ध होईल ते प्रामुख्याने हवाई युद्ध असेल, तंत्रज्ञानाचे युद्ध असेल असे मानले जाते. ऑपरेशन सिंदूर त्याची झलक होती. दोन्ही देशांनी परस्परांच्या सीमा न ओलांडता हे युद्ध केले. भविष्यकाळातही ते होण्याची शक्यता आहे. भारताच्या विरोधात पाकिस्तानला युद्धसज्ज करण्याचे अमेरिका व चीन दोन्ही महाशक्तींनी ठरविलेले आहे.

**चीनचे जेएफ-३५ :** चीन जेएफ थंडर-१० व १७ नंतर जेएफ थंडर- ३५ हे अत्याधुनिक लढाऊ विमान विकसित करीत असून ते पाकिस्तानला विकण्याच्या कराराबाबत दोन्ही देशांमध्ये चर्चा केली जात आहे. चीनचे हे विमान अमेरिकेच्या एफ-३५ च्या तोडीचे मानले जाते. चीनच्या या विमानाचा आरसीएस म्हणजे रडार क्रॉस सेक्शन तळहातापेक्षाही लहान असल्याने तो शत्रूच्या विमानांना पाहता येणार नाही. परिणामी या विमानातील रडार जाम करता येणार नाही. काही बाबतीत तर हे विमान अमेरिकेच्या एफ-३५ पेक्षाही प्रगत असल्याचे मानले जाते. आणि हे विमान पाकिस्तानला देण्याचा चीनचा मनसुबा आहे.

**नवा करार :** जगातील सर्वाधिक मुस्लिम लोकसंख्या असलेला इंडोनेशिया व पाकिस्तान यांच्यात काही दिवसांपूर्वी एक सुरक्षा करार करण्यात आला. पाकिस्तानने काही मुस्लिम देशांशी सुरक्षा करार करण्याचा सपाटा लावला असून त्याच मालिकेत हा करार करण्यात आला असल्याचे समजते. या कराराचा तपशील बाहेर आला नसला तरी संकटाच्या प्रसंगी दोन्ही देश परस्परांच्या मदतीला धावून जातील अशी तरतूद त्यात करण्यात आल्याचे सांगितले जाते. पाकिस्तानने असाच करार काही काळापूर्वी सौदी अरेबियाशी केला आहे.

**मुनीर दुस्साहस करणार? :** पाकिस्तान भारताच्या विरोधात एखादे दुस्साहस करण्याच्या तयारीत असल्याचे म्हटले जात आहे. पाकिस्तानच्या तयारीवरून तसा अंदाज बांधला जात आहे. अमेरिका व चीनची फूस असल्याने फिल्ड मार्शल मुनीर यांचे मनोबल उंचावले असल्याचे सांगितले जाते. पाकिस्तानमधील अंतर्गत स्थितीही कमालीची संवेदनशील असून, मुलकी सरकारच्या हाती आता काहीही राहिले नसल्याचे समजते. शरीफ सरकारचे सारे महत्त्वाचे निर्णय मुनीर घेत आहेत. पाकिस्तानात आता अप्रत्यक्ष लष्करी राजवट सुरू झाली आहे. मुनीर यांना मुलकी सरकार उलथवून टाकण्यासाठी काही करण्याचे काम नाही अशी स्थिती देशात तयार झाली आहे. त्यामुळे भारताच्या विरोधात युद्ध सुरू करण्याचा निर्णय ते स्वत: घेऊ शकतात. त्यासाठी भारताच्या सीमावर्ती भागात एखादा दहशतवादी हल्ला घडवून आणावयाचा. मग भारत त्याला उत्तर देईल. त्याला प्रत्युत्तर म्हणून पाकिस्तानने भारताच्या विरोधात युद्ध सुरू करावयाचे अशी मुनीर यांची मानसिकता असल्याचे मानले जाते.

**लष्कराचा इतिहास :** पाकिस्तानच्या प्रत्येक लष्करी शासकाने भारताच्या विरोधात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष युद्ध केले आहे. जनरल झिया-उल-हक राष्ट्रपती असताना त्यांनी ऑपरेशन टोपाक या सांकेतिक नावाने काश्मीर खोऱ्यात दहशतवाद रुजविण्यास सुरुवात केली. भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केल्यानंतर त्याला उत्तर म्हणून झिया-उल-हक यांनी हे केले होते. एक योगायोग म्हणजे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे बंधू नवाज शरीफ पंतप्रधान असताना, जनरल परवेझ मुशर्रफ यांनी आपल्या सरकारला अंधारात ठेवून कारगिल केले होते. नंतर त्यांनी मुलकी सरकार उलथवित देशाची सूत्रे आपल्याकडे घेतली. नवाज शरीफ यांना लंडनला पलायन करावे लागले. आता शरीफ यांचे बंधू पंतप्रधान आहेत. पाकिस्तानचा एकमेव लोकप्रिय नेता इम्रान खान अडियाला कारागृहात १४ वर्षांची शिक्षा भोगत आहे. पाकिस्तानात घटनादुरुस्ती करीत फिल्ड मार्शल मुनीर यांना तिन्ही सेनादलांचे प्रमुख करण्यात आले आहे. अशा स्थितीत फिल्ड मार्शल मुनीर हे मुशर्रफ-झिया-उल-हक यांच्यापेक्षा वेगळे असतील अशी अपेक्षा करण्याचे कारण नाही. आणि आता तर त्यांना दोन महाशक्तींचे बळ लाभले आहे. अमेरिकेने पाकिस्तानला एल-१६ देणे हा त्याचाच एक भाग मानला पाहिजे.

## वेध

हेमंत सालोडकर

# मोह, माया आणि मेस्सी

फुटबॉल चाहत्यांना ज्याची प्रतीक्षा होती तो अर्जेंटिनाचा दिग्गज खेळाडू लिओनेल मेस्सी अनेक वर्षांनंतर भारतात आला. तो तीन दिवस भारतात राहिला. त्याच्यासोबत त्याचे सहकारी लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डी पॉल होते. भारत भेटीत त्याने कोलकाता, मुंबई, हैदराबाद आणि दिल्ली या चार मोठ्या शहरांना भेटी दिल्या. मेस्सी येणार म्हणून भारतात त्याच्या स्वागतासाठी चाहत्यांनी जोरदार तयारी केली. पहिल्या दिवशी कोलकाता येथे त्याचे स्वागत झाले. कोलकात्यात मेस्सी सॉल्ट लेक स्टेडियममध्ये दाखल झाला. सुरुवातीला सत्कार सोहळा यथोचित पार पडला. पण हा सोहळा अपेक्षेपेक्षा फारच कमी वेळेचा झाला. अवघ्या काही मिनिटांतच मेस्सी स्टेडियममधून निघून गेल्याने उपस्थित चाहत्यांनी स्टेडियममध्ये संताप व्यक्त करीत राडा केला. मेस्सीला प्रत्यक्ष पाहण्यासाठी हजारो चाहते स्टेडियममध्ये जमले होते. अनेकांनी तिकिटांसाठी हजारो रुपये खर्च केले होते. मात्र मेस्सी फार वेळ न थांबल्याने चाहते संतप्त झाले आणि सॉल्ट लेक स्टेडियमवर मिठाचा खडा पडावा तशी परिस्थिती निर्माण झाली. मेस्सी आला आणि गोंधळ घालून गेला असेच म्हणावे लागेल. मेस्सीला पाहण्यासाठी आलेल्या लोकांनी मैदानात घुसण्याचा प्रयत्न केला. काहींनी खुर्च्या आणि बाटल्या फेकून निषेध व्यक्त केला.

जेव्हा लोक आपल्यासाठी हजारो रुपये खर्च करून येतात, तेव्हा जागतिक स्तरावरच्या खेळाडूची जबाबदारी अधिक वाढते. आपल्या अनुपस्थितीने परिस्थिती हाताबाहेर जात आहे, असे कळल्यावर त्याने लोकांना शांत करणे अपेक्षित होते. पण स्टेडियमवर काय गोंधळ सुरू आहे याची जराही माहिती नसल्याने तो आल्या पावली परत गेला असावा. कोलकातामध्ये फुटबॉल हा क्रीडा प्रकार लोकप्रिय आहे. मेस्सी येथे सामना खेळेल अशी माहिती होती. पण मेस्सी फक्त १० मिनिटांसाठी आला. त्याच्याभोवती फक्त राजकारणी आणि मंत्री होते. आम्हाला काहीच दिसले नाही. त्याने एकही किक मारली नाही. इतके पैसे आणि वेळ वाया गेला असे, एका चाहत्याने सांगितले. मेस्सीभोवती फक्त राजकारणी आणि अभिनेते होते. त्यांनाच सोबत ठेवायचे होते तर मग आम्हाला का बोलावले? आमचे पैसे वाया गेले. पैसे भरून मेस्सीचा चेहराही नीट पाहता आला नाही, असा संताप दुसऱ्या चाहत्याने व्यक्त केला. येथे दुसरी बाजू समजून घेतली पाहिजे की, आपल्या दर्शनासाठी हजारो रुपये घेतले जात आहेत, हे मेस्सीला तरी माहीत होते की नाही, हाही प्रश्नच आहे. या संपूर्ण प्रकरणामुळे आयोजकांच्या नियोजनावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मेस्सीसारख्या दिग्गज खेळाडूच्या कार्यक्रमासाठी मोठ्या अपेक्षा होत्या, मात्र त्या पूर्ण न झाल्याने चाहत्यांचा संताप उफाळून आला. मेस्सीचा भारत दौरा ऐतिहासिक ठरण्याची अपेक्षा होती, पण कोलकात्यातील गोंधळाने गालबोट लागले. याचा परिणाम म्हणून या कार्यक्रमाचे आयोजक शताद्रू दत्ताला अटक करण्यात आली. या घटनेच्या चौकशीसाठी समितीही नेमण्यात आली आहे. या घटनेसाठी कारणीभूत ठरलेल्यांची चौकशी केली जाईल. दोषींना शिक्षा होईल. पण जे चाहते मेस्सीला पाहण्यासाठी आले होते, त्यांच्या भावनांची दखल कोण घेईल, हा मोठा प्रश्न आहे. असाच गोंधळ यावर्षी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने तब्बल १८ वर्षांनी आयपीएल चषक जिंकल्यावर उडाला होता. चिन्नास्वामी स्टेडियमवर संघाच्या विजयानिमित्त झालेल्या कार्यक्रमात चेंगरीचेंगरी होऊन ११ जणांचा मृत्यू झाला. तशी गंभीर स्थिती कोलकात्यात निर्माण झाली असती तर किती लोकांचा जीव गेला असता याची कल्पनाही करवत नाही. मेस्सीने नंतर हैदराबाद, मुंबई आणि दिल्ली येथेही भेट दिली. पण तेथे उत्कृष्ट नियोजनामुळे कार्यक्रम व्यवस्थित झाले. कोलकात्यात जेवढी बेशिस्त होती त्याच्या विपरीत स्थिती मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर होती. स्टेडियमवर हजारो चाहत्यांनी ‘‘मेस्सी-सचिन’’चा जयघोष केला. यावेळी हिंदी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकार, राजकारणी उपस्थित होते. एकेक कलाकार येऊन मेस्सीशी हस्तांदोलन करीत होते. मेस्सीसुद्धा अतिशय शांतपणे सर्वांशी बोलत होता. असेच नियोजन कोलकात्यात असते तर तेथील कार्यक्रमाचा आनंद लोकांना घेता आला असता. कोलकाता घटनेपासून धडा घेत यापुढे तरी मेस्सीसारख्या मोठ्या खेळाडूला सार्वजनिक ठिकाणी आणल्यानंतर काय खबरदारी घ्यावी, याची दक्षता घेतली पाहिजे.

९८५०७५३२८१

## कानोसा

अमोल पुसदकर

# व्यसनाधीनतेच्या विळख्यात तरुणाई

१९७१ साली प्रदर्शित झालेल्या ‘हरे कृष्णा हरे राम’ या चित्रपटात व्यसनाच्या विळख्यात हरवलेली तरुणाई ‘‘दम मारो दम, मिट जाये गम’’ या गाण्याच्या माध्यमातून दाखवण्यात आली होती. आज या गोष्टीला जवळपास ५५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ५५ वर्षांत भारतातील व्यसनाधीनतेचे प्रमाण अधिकच वाढले आहे. समाजातील ही व्यसनाधीनता पाहून मनात प्रश्न उभा राहतो की, व्यावसायिक लोकांसोबतच कॉलेजमध्ये जाणारी मुले-मुलीही याच विळख्यात कशी काय सापडली आहेत. एवढेच नव्हे, शाळेतील मुलेही आता यात दिसून येत आहेत. ज्यांच्या आधारावर देशाच्या भविष्याचे सोनेरी स्वप्न समाजाने पाहावे, अशी शाळकरी आणि महाविद्यालयीन पिढी जर व्यसनाच्या विळख्यात सापडत असेल, तर समाजाचे भविष्यही सुरक्षित राहणार नाही.

येणारा काळ आंतरराष्ट्रीय स्पर्धेचा आहे. या काळात भारतालाही सहभाग द्यायचा आहे. जगात नवनवे शोध लागत असताना, तंत्रज्ञान समोर जात असताना भारत केवळ बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही. त्याला जगाच्या रंगमंचावर स्वत:चे उत्कृष्ट प्रदर्शन करावे लागेल. हे प्रदर्शन करणारे नायक म्हणजे आजची शाळकरी पिढी आणि महाविद्यालयीन तरुण-तरुणी आहेत. त्यामुळे समाजातील सर्व समाजचिंतकांनी, जाणत्या लोकांनी या परिस्थितीचा विचार करणे गरजेचे आहे. शाळकरी मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना कसे मार्गदर्शन करता येईल? या विळख्यातून त्यांना कसे सोडवता येतील, याचा विचार आणि कृती करणे आवश्यक आहे. पालकांची, शिक्षकांची, कामगारांची, सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका यात महत्त्वाची आहे. सर्वांनी एकत्र येऊन समाजाला या समस्येपासून मुक्त करण्याचे प्रयत्न करावेत. मुलींची व्यसनाधीनता सुद्धा वाढते आहे. नुकतीच एक बातमी वाचण्यात आली, ज्यात महाविद्यालयीन मुलींच्या व्यसनाधीनतेचे प्रमाण खूप वाढल्याचे लिहिले होते. त्यावरून समजले की, महाविद्यालयातील मुलीही मोठ्या प्रमाणात सिगारेट, दारू आणि इतर मादक द्रव्यांचे सेवन करीत आहेत. दोन-तीन वर्षांपूर्वी पुण्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांनी घातलेली धाड ज्यात अनेक कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी पकडले गेले होते. पूर्वी व्यसनाधीनतेत पुरुष आणि मुलांचे प्रमाण अधिक असायचे; महिला यातून मुक्त असायच्या. ग्रामीण भागात शेतावर काम करणाऱ्या महिला तंबाखू खायच्या. पण आता शहरांमधील मुली चौकाचौकात सिगारेटचे झुरके सोडताना दिसत आहेत.

शिक्षणाच्या निमित्ताने दुसऱ्या शहरांत, महानगरांत जाऊन शिक्षण घेण्याचे प्रमाण वाढले आहे. तिथे मुले-मुली घर सोडून राहतात. तेव्हा त्यांचा परिचय व्यसनाधीनतेच्या नव्या जगाशी होतो. जिथे सोबतची मुले दारू पितात, म्हणून हाही दारू प्यायला लागतो; सोबतची सिगारेट ओढतात, म्हणून हाही सिगारेट हाती घेतो. पूर्वी दारू-सिगारेटपर्यंत मर्यादित असलेल्या व्यसनात आता एमडी पावडरसह इतर द्रव्यांचाही समावेश झाला आहे. पूर्वी मुलींना सिगारेट ओढताना पाहून आश्चर्य वाटायचे; आता त्या चौकाचौकात मित्रांसह सिगारेट अर्धी-अर्धी ओढताना दिसतात. व्यसनाचे घातक परिणाम हे स्त्री-पुरुष दोघांच्याही शरीरावर होतात. आजच्या मुली या भविष्यातील माता आहेत. स्त्रीचे शरीर नवनिर्मितीसाठी बनलेले आहे. व्यसनामुळे शरीरात जाणारे घातक पदार्थ भविष्यातील प्रजननक्षमतेवर, गर्भधारण क्षमतेवर परिणाम करू शकतात. एक व्यसनाधीन माता आपल्या मुलांना संस्कारक्षम बनवू शकते का? हा प्रश्न समाजाला भेडसावतो. सिनेसृष्टीतील अनेक अभिनेत्री लग्न, मातृत्वापूर्वी शरीर विषमुक्त करण्यासाठी आयुर्वेद, योग, निसर्गोपचार घेतात. म्हणजे त्यांना माहीत आहे की, व्यसनामुळे शरीर विषमुक्त राहिलेले नाही. रासायनिक खतांमुळे जशी जमिनीची उर्वराशक्ती नष्ट होते, तशी व्यसनामुळे मुलींच्या शरीरावर परिणाम होतो. व्यसन केवळ शरीर दुर्बल करत नाही, तर मनालाही दुर्बल करते. दुर्बल मनाच्या व्यक्तीला जीवनसमस्यांना तोंड देणे कठीण जाते. व्यसनातून एकटेपणा, निराशा वाढते. ‘‘हर फिक्र को धुएं में उडाता चला गया’’ हे सोपे वाटते, पण चिंता जात नाहीत. प्रथम दारू पिणारा दारू पितो; नंतर दारू त्याला पिते. प्रथम व्यक्ती व्यसनाचा उपभोग घेते; नंतर व्यसन व्यक्तीचा भोग घेते.

आज स्पर्धेचे युग आहे. कामाच्या ठिकाणी राजकारण, वरिष्ठांकडून अन्याय, मित्रांकडून हेटाळणी असे मानसिक आघात होतात. परंतु याचे उत्तर व्यसन नाही. नुकतीच मी एक बातमी वाचली. सई जाधव नावाची तरुणी डेहराडूनच्या सैन्यप्रशिक्षण केंद्रातून अधिकारी म्हणून बाहेर पडली. या महाविद्यालयातून ६७ हजार विद्यार्थ्यांनी सैन्यात प्रवेश मिळविला आहे. पण ९३ वर्षांच्या इतिहासात ही पहिली मुलगी आहे जिने सैन्यामध्ये अधिकारी म्हणून प्रवेश मिळविला आहे. सैनिकांच्या विधवा कठीण प्रशिक्षण पूर्ण करून सैन्यात प्रवेश घेतात. कुठे २२ वर्षांची मुलगी अधिकारी होते, कुठे पायलट होते, कुठे चांद्रयान मोहिमेचे नेतृत्व करते. यांच्याही जीवनामध्ये व्यसनांचा पर्याय उपलब्ध आहे तरीही त्या या मार्गाने गेल्या नाहीत.कर्तबगार स्त्रियांचा पाया भक्कम आहे. व्यसनाधीन असत्या तर हे शक्य झाले नसते. आधुनिकता आणि स्वातंत्र्य म्हणजे व्यसनाधीनता नव्हे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. **उपाययोजना आणि संकल्प :** कुटुंब, समाज, राष्ट्राच्या स्वप्नांची जबाबदारी तरुणांवर आहे. त्यांना व्यसनांच्या विळख्यातून वाचविणे हे समाजचिंतकांचे कार्य आहे. शाळांमधून प्रबोधन आवश्यक आहे. पोलिसांचे ‘ऑपरेशन थंडर’सारखे चांगले उपक्रम चालतात. तरीही गावात २०० कोटींचे मादक द्रव्य पकडले जाते. महाविद्यालयाबाहेरील हॉटेल्स, कॉफी हाऊसमधून मादक द्रव्यांचा पुरवठा होतो. कधी राजकीय, कधी पोलिसांच्या आशीर्वादाने हे सर्व चालते. आपण जी इतरांच्या घरात आग लावतो, ती आपल्या घरालाही जाळू शकते हे लक्षात ठेवले पाहिजे.

**‘‘दूसरो के घर आग लगाने का सपना,**
**सदा अपने ही घर खरा होता है’’**

एका कथेत एका व्यक्तीला खूप मोठी दौलत मिळेल असे सांगितले जाते. पण बदल्यात जगाच्या कोपऱ्यात एक माणूस मरेल असे त्याला सांगितले जाते. तो मान्य करतो. परंतु तो जेव्हा घरी पोहोचतो तेव्हा त्याचा मुलगा मृत आढळतो. तस्करीमुळे चालत्या-बोलत्या मुलांचे भविष्य नष्ट होते. तस्करांप्रमाणेच त्यांना साहाय्य करणारे काही पोलिस अधिकारी, राजकीय नेते हेही या परिस्थितीला जबाबदार आहेत. व्यसनाधीनता घरोघरची समस्या आहे. प्रबोधन, समुपदेशन, मार्गदर्शनाने ती संपवावी. व्यसनाधीन तरुणांना कला, साहित्य, खेळ, छंद यात गुंतविणे आवश्यक आहे. अशांना जीवनासाठी ध्येय द्यावे. ध्येयवादी विद्यार्थी यशस्वी होईल; ध्येयहीन व्यसनी बनेल. माझ्या संपर्कातील किमान पाच तरुणांना मी मार्गदर्शन करेन, त्यांच्या समस्या ऐकून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवेन, असा संकल्प सुजाण लोकांनी करणे आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## सद्गुरू श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज

श्रीनृसिंह सरस्वती स्वामी महाराज हे भगवान दत्तात्रेयांचे दुसरे पूर्णावतार मानले जातात. त्यांचा जन्म १३७८ मध्ये कारंजा (लाड), वाशीम येथे झाला. त्यांचे बालपण अत्यंत विलक्षण होते. लहानपणापासूनच त्यांच्यातील विलक्षण तेज आणि आध्यात्मिक शक्ती लोकांना जाणवू लागली.

श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे संपूर्ण चरित्र हे शरणागत भक्तांच्या रक्षणाचे जिवंत उदाहरण आहे. जेव्हा भक्त ‘‘पाही माम्’’ (माझे रक्षण करा) अशी हाक मारतो, तेव्हा महाराज कोणत्याही मर्यादा ओलांडून धावून येतात. त्यांच्या विश्वंभर रूपाने त्यांनी हे सिद्ध केले की, जे शरण येतात, त्यांच्यासाठी ते प्रत्यक्ष ढाल बनतात. महाराजांकडे केवळ शारीरिक व्याधी घेऊनच लोक येत नसत, तर जे संभ्रमात होते, जे अहंकाराने ग्रासलेले होते, त्यांचेही त्यांनी रक्षण केले. त्रिविक्रम भारतींसारख्या विद्वान पंडितांचा अहंकार दूर करून त्यांना सत्य ज्ञानाचा मार्ग दाखवला. अज्ञान आणि अहंकारापासून रक्षण हेच खऱ्या अर्थाने बुद्धीचे रक्षण आहे. ज्या काळी कुष्ठरोग हा असाध्य आणि कलंक मानला जाई, त्या काळी महाराजांनी केवळ दर्शनाने आणि आशीर्वादाने अनेक भक्तांना या रोगातून मुक्त केले. पाही माम् म्हणणाऱ्याला त्यांनी निरोगी आयुष्य बहाल केले. गाणगापूर आणि आजूबाजूच्या परिसरात जेव्हा अन्नान्न दशा होती, तेव्हा महाराजांच्या कृपाप्रसादाने लोकांची दुःखे दूर झाली. अनेकांचे महाराजांनी व्याधी आणि संकटांपासून रक्षण केले. महाराज हे केवळ एका व्यक्तीचे रक्षणकर्ते नाहीत, तर ते विश्वाचे पोषण करणारे विश्वंभर आहेत. त्यांच्या चरणी मस्तक टेकवणे म्हणजेच विश्वाच्या सर्वोच्च शक्तीला शरण जाणे होय. त्यांच्या आरतीतील ‘‘नृसिंह सरस्वति जय विश्वंभरिता’’ हा जयघोष आणि ‘‘पाही माम्’’ ही प्रार्थना एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एक त्यांची महती सांगते, तर दुसरी आपल्यातील समर्पण व्यक्त करते. महाराज जरी कर्दळीवनात गुप्त झाले असले, तरी त्यांनी जाताना वचन दिले होते की, ‘‘मी गाणगापुरातच आहे.’’ आजही जो भक्त मनोभावे सद्गुरूंची आळवणी करतो, त्याला महाराजांच्या अस्तित्वाची आणि रक्षणाची प्रचीती येते.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

## वाचक पत्रे

### निमित्त ३१ डिसेंबरचे...

३१ डिसेंबर जवळ येताच मस्ती करावी, नशा करावी, मद्यपान करावे, झिंगावे आणि कुठेतरी पडावे या विचारांची वळवळ दिसू लागली आहे. ३१ डिसेंबर म्हणजे फटाके, अपघात, मुलींवरील अत्याचार, पार्ट्या यांना उधाण येते. पोलिस यंत्रणेवर अवाजवी ताण येतो. पुढे काही दिवस वृत्तपत्रे, न्यूज चॅनेल यांमधून भयानक बातम्या थंडपणे दिल्या जातात. मुली व स्त्रियाही या ३१ डिसेंबरच्या वादळात सहभागी होताना दिसत आहेत. स्त्रीवर्ग यात सहभागी होताना परिणामांचा विचार करताना दिसत नाही. काही विपरीत घडले की मग मात्र अगदी दाही दिशांनी टाहो फोडले जातात. अपरात्री घराबाहेर पडणे, मद्यपान करणे, नशा करणे, झिंग आणणारे संगीत ऐकणे, यांमुळे अपघात होणे, मुला-मुलींनी शारीरिक सलगी करणे हे आधी माहीत नव्हते असे भासवले जाते. पण ते खरे नाही. कारण गेली अनेक दशके हे चालू आहे. म्हणजेच सर्व माहीत असूनही आपण नकळतपणे त्यात सहभागी होत आहोत. आपल्या घरातली व आजूबाजूची लहान मुले हे सर्व पाहात आहेत. थोड्याच वर्षात तीही याच मार्गाने जातील. का नासवतोय आपण आपल्या देशाच्या भवितव्याला? यावर्षी निश्चय करूया, ३१ डिसेंबरला रात्री शांतपणे घरी झोपूया!

**छाया मिराशी**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## आजचे संघगीत-८०

सोमवार, २२ डिसेंबर २०२५

### लढता लढता आत्मसमर्पण

लढता लढता आत्मसमर्पण
मरण नव्हे रे ते चिर जीवन ॥धृ ॥

पायातिल जो होउन पत्थर, स्वातंत्र्याचे उभवी मंदिर
थोर खरोखर तो कळसाहुन ॥१॥

निजप्राणांची उजळून ज्योती, ही आईची असे आरती
हे चरणांचे तिच्याच पूजन ॥२॥

यज्ञाची ही असे सांगता, आयुष्याची हीच सफलता
हे राष्ट्राचे अपुल्या भूषण ॥३॥

या वीरांची जीवन गाथा, मूर्तिमंत ती असे अस्मिता
ते स्फूर्तीचे निधान पावन ॥४॥

गर्व आईला अशा मुलांचा, सन्मानच तो जन्म-भूमिचा
कृतार्थ माता त्यांना प्रसवुन ॥५॥

दिव्यत्वाची इथे प्रचीती, अमर तयांची जगात कीर्ती
स्मृतीस त्यांच्या त्रिवार वंदन ॥६॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## २४ डिसेंबर रोजी लोकसेवा पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**
भारतरत्न, माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मदिनानिमित्त धाराशिव येथील लोकसेवा समिती संस्थेच्या वतीने दिला जाणारा मराठवाडास्तरीय लोकसेवा पुरस्कार वितरण सोहळा बुधवार, दि.२४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. यंदा या पुरस्काराचे १६ वे वर्ष आहे.

हा पुरस्कार वितरण कार्यक्रम जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच लोकसेवा समितीचे उपाध्यक्ष डॉ. अभय शहापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. बुधवार, दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी ४ वा. खा. प्रमोद महाजन बहुउद्देशीय सभागृह, आर्य चाणक्य विद्यालय परिसर, वरुडा रोड, समर्थ नगर, धाराशिव येथे हा कार्यक्रम होणार आहे. यंदाचा लोकसेवा पुरस्कार अंबाजोगाई येथील ज्ञानप्रबोधिनीचे प्रसाद मधुकरराव चिक्षे, धाराशिव जिल्ह्यात पालावरची शाळा चालवणारे चंद्रशेखर बाबुराव पाटील तसेच मातोश्री वृद्धाश्रम, लातूर या संस्थेला देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कार वितरण कार्यक्रमास धाराशिव शहर व जिल्ह्यातील नागरिकांनी उपस्थित रहावक, असे आवाहन पुरस्कार संयोजन समितीचे अध्यक्ष व लोकसेवा समितीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, सचिव कमलाकर पाटील तसेच सदस्य शेषाद्री डांगे यांनी केले आहे.



# परंडा नगरपरिषदेत अटीतटीच्या लढतीत जाकीर सौदागर विजयी

## शिवसेना शिंदे गटाला ८ जागा तर जनशक्ती नगरविकास आघाडीला १२ जागा...



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ डिसेंबर -**
नगरपरिषद परांडा अंतर्गत सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि.२ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीतपणे पार पडली होती. मात्र मतमोजणीसाठी मतदारांना तब्बल १८ दिवस प्रतीक्षा करावी लागली. त्यामुळे कोण निवडून येणार, याबाबत सर्वत्र उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

अतिशय चुरशीने पार पडलेल्या या निवडणुकीची मतमोजणी रविवार, दि२१ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता परांडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वसतिगृह येथे सुरू झाली. मतमोजणी प्रक्रिया नियोजित वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी प्रशासनाकडून व पोलीस प्रशासनाकडून काटेकोर नियोजन करण्यात आले होते.

निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार निलेश काकडे यांच्या उपस्थित झालेल्या मतांची मतमोजणीसाठी ५ टेबलची व्यवस्था करण्यात आली होती. प्रत्येक टेबलवर ५ कर्मचारी असे २५ कर्मचारी नियुक्त केले होते. झालेल्या मतमोजणीत शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाकीर सौदागर ६७९५ मते घेऊन १८९ मताने विजयी झाले. जनशक्ती नगर विकास आघाडीचे उमदेवार विश्वजीत पाटील यांना ६६०६ मते मिळाली आहेत. तर शिवसेना शिंदे गटाचे २० उमेदवारांपैकी ८ उमेदवार नगरसेवक पदाचे विजयी झाले आहेत. तर सर्वपक्षीय भाजपा, शिवसेना उबाठा गट, राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या जनशक्ती नगरविकास आघाडीचे २० उमेदवारांपैकी १२ नगरसेवक पदाचे उमेदवार विजयी झाले आहेत.

आघाडीचे बहुत झाले असले तरी त्यांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार विश्वजित ज्ञानेश्वर पाटील हे थोडक्या मताने पराभूत झाले आहेत. अतितटीच्या निवडणुकीत अखेर पुन्हा जाकीर सौदागर यांनी बाजी मारली आहे.

परांडा शहरातील एकूण १० प्रभागांसाठी ५ स्वतंत्र टेबल्स ची व्यवस्था करण्यात आली होती. मतमोजणीसाठी प्रत्येक टेबलवर ५ प्रशिक्षित कर्मचारी, अशा प्रकारे एकूण २५ प्रशिक्षित कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. याशिवाय संगणक व सारणी कामकाजासाठी ४ कर्मचारी, तर सहाय्यक कामकाजासाठी ४ कर्मचारी नेमण्यात आले होते.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे मतमोजणी पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पडत असल्याचे चित्र पाहायला मिळाले. नगराध्यक्ष पदासाठी जाकीर सौदागर यांचा विजय होताच त्यांच्या समर्थकांनी गुलालाची उधळण करीत मोठा जल्लोष केला.

परंडा नगरपरिषद निवडणूकीचा निकाल खालील प्रमाणे : प्रभाग १ अ रत्नमाला बनसोडे (आघाडी ९३८ मते, १७३ मतांनी विजयी) तर आदिका पालके (शिवसेना ७६५ मते), मिनाक्षी बनसोडे (अपक्ष ६७ मते), सुवर्णा बनसोडे (४३ मते).

प्रभाग १ ब श्रीकृष्ण विधाते (आघाडी ९४६ मते, १०४ मतांनी विजयी), संजय घाडगे (शिवसेना ८४२), प्रभाग २ अ रुक्सानाबेगम पठाण (आघाडी ६८१ मते, ६१ मतांनी विजयी), फर्जनाबी मुजावर (शिवसेना ६२०), प्रभाग २ ब सरफराज कुरेशी (शिवसेना ६५१ मते, ८ मतांनी विजयी), इस्माईल कुरेशी (आघाडी ६४३), प्रभाग ३ अ परवीन बासले (आघाडी ७६२ मते, १९८ मतांनी विजयी), गुलनार पठाण (शिवसेना ५६४ मते).

प्रभाग ३ ब मदनसिंह सद्दीवाल (आघाडी ७०९ मते, ९९ मतांनी विजयी), मदन दीक्षित (शिवसेना ६१०), प्रभाग ४ अ मदीनाबी पठाण (आघाडी ६४१ मते, ६४ मतांनी विजयी), जैतुनबी पठाण (शिवसेना ५७७) प्रभाग ४ ब समरजीतसिंह ठाकुर (आघाडी ६७६ मते, १४६ मतांनी विजयी), अजीम सौदागर (शिवसेना ५३०), नवनाथ कसबे (अपक्ष १६ मते), प्रभाग ५ अ शमीम तांबोळी (शिवसेना ६९१ मते, १०१ मतांनी विजयी), नंदाबाई जाधव (आघाडी ५९० मते), प्रभाग ५ ब सत्तार पठाण (शिवसेना ६६३, ५० मतांनी विजयी), रईसोद्दीन मुजावर (आघाडी ६१३), प्रभाग ६ अ अनिल शिंदे (आघाडी ७९२, ३०६ मतांनी विजयी), जयंत शिंदे (शिवसेना ४८६), प्रभाग ६ ब वैशाली अलबत्ते (आघाडी ७९२, ३१२ मतांनी विजय), मनीषा मेहेर (शिवसेना ४८०), प्रभाग ७ अ आब्बास मुजावर (आघाडी ९४३ मते, ६४ मतांनी विजय), इरफान शेख (शिवसेना ८७९ मते).

प्रभाग ७ ब रुखियाबी दहेलूस (आघाडी ९४० मते, ६९ विजय), कमल जगताप (शिवसेना ८७१), प्रभाग ८ अ साबेर सौदागर (शिवसेना ९३१ मते, ३९९ मतांनी विजयी), गुले इरम चौधरी (आघाडी ५३२), प्रभाग ८ ब आमीनाबी मुजावर शिवसेना १००२ मते (आघाडीच्या आमीनाबी मुजावर (५४६ मतांनी विजयी).

प्रभाग ९ अ मन्नाबी जिनेरी (शिवसेना ५६८ मते, १७८ मतांनी विजयी), हसीना पठाण (आघाडी ३९०).

प्रभाग ९ ब चंद्रकांत गायकवाड (शिवसेना ५२९ मते, ९६ मतांनी विजयी), उमाकांत गोरे (आघाडी ४३३), प्रभाग १० अ वनमाला रामा शिंदे (शिवसेना ५२५ मते, १४७ मतांनी विजयी), ज्योती सोनटक्के (आघाडी ३७८ मते) तर १० ब रमेशसिंह परदेशी (आघाडी ४६० मते, २३ मतांनी विजयी) व मोहसीन सौदागर (शिवसेना (४३७ मते).

### फेरमतमोजणीचा अर्ज फेटाळला...
नगराध्यक्ष पदासाठी तसेच प्रभाग क्रमांक २ मधील एका जागेसाठी फेरमतमोजणी (रिकाउंटिंग) करण्याबाबत जनशक्ती नगरविकास आघाडीचे उमेदवार विश्वजीत पाटील यांच्या वतीने अर्ज दाखल करण्यात आला होता. मात्र सादर केलेली कारणे योग्य वाटली नसल्याने निवडणूक अधिकारी तहसीलदार निलेश काकडे यांनी हा अर्ज फेटाळला असल्याची माहिती देण्यात आली.

## मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भाजपचे कमळ...

# काँग्रेसची एकहाती सत्ता कोसळली; बापुराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक विजय



**तभा वृत्तसेवा**
**मुरूम, दि.२१ डिसेंबर -**
मुरूम नगरपरिषदेवर प्रथमच भारतीय जनता पार्टीचे कमळ फुलले असून, आजवर काँग्रेसची एकहाती सत्ता असलेला बुरुज या निवडणुकीत पूर्णपणे ढासळला आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या निकालात भाजपाने ऐतिहासिक कामगिरी करत नगरपालिकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

या निवडणुकीत भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापुराव पाटील यांनी स्वतः निवडणूक रिंगणात उतरून दणदणीत विजय मिळवला. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपाने २० पैकी १९ नगरसेवक निवडून आणत नगरपरिषदेवर एकहाती सत्ता मिळवण्यात यश मिळवले आहे.

दरम्यान, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे अजितकुमार अरविंद चौधरी यांनी नगराध्यक्ष पदासह नगरसेवक पदासाठी निवडणूक लढवली होती. मात्र नगराध्यक्ष पदावर त्यांना पराभव स्वीकारावा लागला असून ते नगरसेवक म्हणून विजयी झाले आहेत. निवडणूक निकाल जाहीर होताच मुरूम शहरात भाजप कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

फटाके, गुलाल व जल्लोषात हा ऐतिहासिक विजय साजरा करण्यात आला. अनेक नागरिकांनी हा कौल विकास व स्थिर प्रशासनाच्या बाजूने दिला असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

### प्रभागनिहाय विजयी उमेदवार...
**प्रभाग १ :** स्नेहा राम बंडगर भाजप, अमर धनराज भोसगे भाजप. **प्रभाग २ :** सचिन गुलाब फनेपुरे भाजप, श्रीदेवी नागप्पा दुर्गे भाजप. **प्रभाग ३ :** महादेवी बबन बनसोडे भाजप, अहमद युनूस मनियार भाजप. **प्रभाग ४ :** अंकिता राजकुमार अंबुसे भाजप, निरजानंद सच्चिदानंद अंबर भाजप. **प्रभाग ५ :** गौस रशीद शेख भाजप, निर्मला प्रकाश कंटेकुरे भाजप. **प्रभाग ६ :** रूपचंद गायकवाड भाजप, मुमताजबी मलंग ढोबळे भाजप. **प्रभाग ७ :** रमेश दत्तू चव्हाण भाजप ज्योती शेळके भाजप. **प्रभाग ८ :** सुनिता मारुती बने भाजप, राजेंद्र संभाजी बेंडकाळे भाजप. **प्रभाग ९ :** समीना मुल्ला भाजप, अजितकुमार अरविंद चौधरी उबाठा. **प्रभाग १० :** रागिनी भारत गायकवाड भाजप, सिद्राय्या सायबण्णा ख्याडे भाजप.



**धाराशिव :** नळदुर्गचे बसवराज धरणे, तुळजापूरचे विनोद उर्फ पिटु गंगणे, धाराशिवच्या नेहा राहुल काकडे व कळंबच्या सुनंदा कापसे या चार नगराध्यक्ष यांचा सत्कार करताना आमदार राणाजगजितसिंह पाटील. यावेळी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, शिवाजी कापसे, नय्यर जहागीरदार, विनोद गपाट, निहाल काझी आदि उपस्थित होते.

## तुळजापूर येथे प्रवाशाची बॅग चोरीस; ४४ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ डिसेंबर -**
प्रवाशाच्या बॅगमधील मौल्यवान वस्तू अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत फिर्यादी माणिक धोंडीराम डुबल (वय ५२, रा. बेलवडे बुद्रुक) यांनी तक्रार दाखल केली आहे. फिर्यादी यांच्या ट्रॅव्हल्स क्र. एमएच ५० एन ४४१४ मधील बॅगमध्ये ठेवलेले ७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, १,३०० रुपये रोख रक्कम व एक मोबाईल फोन, असा एकूण ४४,३०० रुपये किमतीचा माल दि.२० डिसेंबर २०२५ रोजी पहाटे ३.३० ते ५.३० दरम्यान मुलींची कन्या शाळा, तुळजापूर येथून अज्ञात व्यक्तीने चोरून नेला.

या प्रकरणी फिर्यादी माणिक डुबल यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यातगुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

### प्रतिनिधी नेमणे आहेत...
सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.


**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.
**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**
दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

# तुळजापूर नगर परिषदेवर भाजपचे कमळ फुलले

## विनोद गंगणे विजयी भाजपचे तर काँग्रेसचे अमर मगर यांचा पराभव





**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ डिसेंबर -**
तुळजापूर नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष पदाच्या लढतीत भाजपचे विनोद गंगणे यांनी काँग्रेसच्या अमर मगर यांचा १६८६ मतानी पराभव केला. तर नगरसेवक पदासाठी भाजपचे १८ तर काँग्रेसचे ५ उमेदवार निवडून आले आहेत.

तुळजाभवानी अभियांत्रिकी विद्यालयात सकाळी दहा वाजता मतमोजणीस सुरुवात झाली. पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त ठेवला होता. काही दिवसापूर्वीच झालेल्या वादामुळे मतमोजणीसाठी शहरातील सावरकर चौक ते हेलीपॅड कॉर्नर पर्यंत सकाळी आठ ते दुपारी दोन पर्यंत रस्ता बंद ठेवण्यात आला होता.

पोलीस उपविभागीय अधीक्षक डॉ. निलेश देशमुख यांनी स्वतः उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधीची तपासणी करूनच त्यांना मतमोजणी कक्षाकडे प्रवेश दिला. प्रभाग क्रमांक एक अ मध्ये मंजुषा देशमाने आणि ब मध्ये पंडित जगदाळे, प्रभाग क्रमांक दोन मध्ये औदुंबर कदम ब मध्ये नीता क्षीरसागर प्रभाग क्रमांक तीन अ मध्ये अनुजा कदम या बिनविरोध आल्या होत्या. तर ब मध्ये लखन पेंदे प्रभाग क्रमांक चार अ मध्ये सुनील रोचकरी ब मध्ये श्वेता साळुंखे प्रभाग क्रमांक पाच अ महंताबाई साठे ब मध्ये माऊली भोसले, प्रभाग क्रमांक सहा अ मध्ये सागर कदम ब मध्ये सरोजा अमृतराव हे सर्व भाजपचे उमेदवार निवडून आले आहेत. तर प्रभाग क्रमांक सात अ मध्ये प्रगती लोंढे आणि ब मध्ये रणजीत इंगळे हे दोन्हीही काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. प्रभाग क्रमांक आठ मध्ये भाजपच्या ज्योती सावंत तर ब मध्ये काँग्रेसचे अक्षय कदम निवडून आले आहेत.

प्रभाग क्रमांक नऊ अ मध्ये काँग्रेसचे अमोल कुतवळ तर ब मध्ये भाजपच्या जयश्री कंदले या निवडून आले आहेत.

प्रभाग क्रमांक १० मध्ये काँग्रेसचे आनंद जगताप तर ब मध्ये भाजपच्या प्रियंका गंगणे या निवडून आले आहेत. तर प्रभाग क्रमांक ११ अ मध्ये अश्विनी रोचकरी, ब मध्ये प्रिया मलकुनाईक आणि क मध्ये रामचंद्र रोचकरी हे तिन्हीही भाजपचे उमेदवार निवडून आले आहेत.

निकालानंतर भाजप पदाधिकारी कार्यकर्त्यांनी शहरात गुलाल उधळून फटाक्यांची आतषबाजी केली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अधिकाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करावे -अपारंपारिक ऊर्जा संचालक सुमन चंद्रा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**

आकांक्षित तालुका अंतर्गत वडवणी मधील प्रगती चांगले आहे. यापुढील काळातही यापेक्षा अधिक गतीने काम करून विशेषत्वाने महिलांचे जीवनमान उंचवावे जेणेकरून येथील बालविवाहाचे प्रमाण कमी होऊ शकते. कोणी येऊन काम करेल याची वाट न बघता सर्व अधिकाऱ्यांनी हे आपलेच काम समजून स्वयं प्रेरणेने काम करण्याची गरज आहे. हो सर्वांनी करावे असे आवाहन नवीन आणि नवीनिकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या संचालक सुमन चंद्रा यांनी येथे केले.

आकांक्षित तालुका विकास कामाचा आढावा आज एका बैठकीत घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान तसेच अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, जिल्हा नियोजन अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थित होती.

देशात ५०० ब्लॉक मधील तालुक्यामध्ये हा आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मागासलेल्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठेवलेले आहे. यामध्ये वडवणी तालुका देशात ११७ व्या क्रमांकावर असून चार झोन अंतर्गत ६९ ब्लॉक मध्ये बारावा आणि राज्यात वडवणी तालुका कामाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे.



या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, सामाजिक विकास आणि पायाभूत सुविधा या सात मुद्द्यावर आधारित उद्दिष्टे ठरवून विकास करावयाचा आहे. बीडमध्ये बदल घडत आहे याचा संदेश दिला गेला पाहिजे. या ठिकाणी असणाऱ्या बालविवाह समस्येचे मूळ विविध कारणांमध्ये आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण त्यांचे समाजातील स्थान आणि त्यांच्या कार्याचे मोल या मुद्द्यांवर लक्ष दिले गेले पाहिजे असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या.समस्येचा शोध घेतला आहे त्याची योग्य कारणमीमांसा व त्यावर सकारात्मकपणे उपाय योजना या माध्यमातून विकास साधता येईल, असे सांगून त्या म्हणाल्या की, बालविवाहाच्या समस्येवर लक्ष केंद्रित करताना त्याला प्राधान्य दिले तर बालविवाह करण्याचे प्रमाण कमी होईल.मुलींना शिक्षणात प्राधान्य देण्याबाबत प्रसिद्धी तसेच प्रत्यक्ष यांच्यात जाणीव जागृती गरजेची आहे. कार्यक्रमांतर्गत बचत गटांना केवळ मर्यादित भूमिकेत न ठेवता त्यांना उद्योग प्रशिक्षण आणि त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. या गटांना मुद्रा कर्ज योजनेतून अधिकाधिक व्यवसाय आणि उद्योग यासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच प्रशिक्षित करण्याची गरज आहे. असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या.

विकासाचा आढावा केवळ आकडेवारीवर न घेता प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या जीवनात त्याचा किती लाभ झाला आहे याचे चित्रण आगामी काळात मांडावे. अशा सूचना सुमन चंद्रा यांनी यावेळी दिल्या.शक्य तितक्या प्रमाणात आवास योजना तसेच प्रधानमंत्री सूर्यघर आणि शेतकऱ्यांसाठी च्या सुमन योजने अंतर्गत अधिकाधिक लाभ देण्याच्या दृष्टीने अभ्यास करा व माहिती सादर करा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिलें

## राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर २०२५ निमित्त जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात यावा:- अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ डिसेंबर**



दिनांक २२ /१२/ २५ रोजी ग्राहक पंचायत महाराष्ट्र बीड जिल्हा उपाध्यक्ष यांनी गेवराई तालुक्याच्या वतीने मा. तहसीलदार संदीप जी खोमणे यांना निवेदन देण्यात आले. ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या वतीने शासन परिपत्रकाप्रमाणे राष्ट्रीय ग्राहक दिन २४ डिसेंबर २०२५ निमित्य विविध उपक्रम राबविण्यात यावेत. अशी मागणी करण्यात आली.

उद्देश;- ग्राहक संरक्षण कायदा २०१९ अंतर्गत ग्राहकांना त्याच्या हक्का बद्दल आणि जबाबदाऱ्याबद्दल जागरूक करणे. बाजारात होणाऱ्या फसवणुकीबद्दल आणि भेसळी बद्दल ग्राहकांना माहिती देणे. ग्राहक मंचाच्या माध्यमातून तक्रार निवारण प्रक्रियेबद्दल मार्गदर्शन करणे. ग्राहकांना ग्राहक पंचायत च्या कार्यात सहभागी प्रोत्साहित करणे. सुचवलेले उपक्रम: शाळा/ कॉलेज स्तरावर ग्राहक हक्क व जबाबदारी आधारित प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धा घेणे. स्थानिक वृत्तपत्रे, सोशल मीडिया आणि जाहीर सभातून जनजागृती करणे. ग्राहक हक्क आधारित माहितीपत्रके व पोस्टर्स तयार करून वाटणे. ग्राहक पंचायत प्रतिनिधी द्वारे मार्गदर्शन शिबिर आयोजित करणे. याबाबत मा. तहसीलदार मा.संदीप जी खोमणे यांना निवेदन देण्यात आले व चर्चा झाली. तसेच याबाबत श्री गजानन मोरे साहेब पुरवठा नायब तहसीलदार यांच्याशी कार्यक्रमाबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली .याप्रसंगी गेवराई ग्राहक पंचायत तालुकाप्रमुख प्रा. भानुदास फलके, मोहनराव राजहंस, संतोष कापसे आदी हजर होते.

## गेवराईत राष्ट्रवादीला धक्का; भाजपाचे नगराध्यक्षासह १६ नगरसेवक विजयी

### पंकजाताईंच्या नेतृत्वात बाळराजे पवार, बदामराव पंडितांची ताकद भक्कम झाली

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२२ डिसेंबर**

गेवराई नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने निर्विवाद वर्चस्व सिद्ध करत जोरदार यश संपादन केले आहे. एकूण २० नगरसेवकांच्या जागांपैकी तब्बल १६ जागांवर भाजपचे उमेदवार विजयी झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसला केवळ ४ जागांवर समाधान मानावे लागले आहे. नगराध्यक्षपदासाठी भाजपच्या गिताभाभी (गीता त्रिंबक उर्फ बाळराजे) पवार यांनी तब्बल ५०५४ मतांनी दणदणीत विजय मिळवला आहे. या निवडणुकीत भाजपच्या मंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे बंधू बाळराजे पवार आणि माजी राज्यमंत्री बदामराव पंडित एकत्र आल्याने भाजपची ताकद अधिक भक्कम झाली. या राजकीय एकीचा थेट फायदा भाजपला झाला असून, निकालातून ते स्पष्टपणे दिसून आले. याउलट राष्ट्रवादी काँग्रेसचे विद्यमान आमदार विजयसिंह पंडित व माजी आमदार अमरसिंह पंडित यांना या निकालामुळे मोठा धक्का बसला आहे.

गेवराई नगरपरिषद निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. या निवडणुकीत मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ७३.२९ टक्के मतदान केले होते. वाढलेल्या मतदान टक्केवारीमुळे निकालाबाबत सर्वच राजकीय पक्ष व उमेदवारांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सोमवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात. होऊन नगराध्यक्ष पदासह १० वाडाँतील निकाल दुपारी १२ वाजेपर्यंत जाहीर झाले. भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसने अतिशय प्रतिष्ठेच्या केलेल्या या लढतीत भाजपने बाजी मारली.

भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार गीता त्रिंबक उर्फ बाळराजे पवार यांना पहिल्या फेरीपासून सुरु असलेली आघाडी शेवटच्या फेरीपर्यंत कायम राहून त्यांना १३,२४६ मते तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार दाभाडे शितल महेश यांना ८,२१० मते पडली. या लढतीत गिताभाभी पवार यांचा तब्बल ५०५४ मतांनी विजय झाला. तर बागवान जबीन जानमहंमद (राष्ट्रवादी शरद पवार गट) २५३, महाजन साधना मुकेश (शिंदे शिवसेना) ८६, साळवे संदीप मारोती (राष्ट्रीय काँग्रेस) ५४, संगिता शाम गायकवाड (अपक्ष) २०२ मते पडली. तर १० प्रभागातील २० नगरसेवक पदांपैकी १६ नगरसेवक भाजपचे तर केवळ ४ नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडून आले आहेत. या निकालाने गेवराईच्या राजकारणात भाजपने आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे. नगराध्यक्षपदासह बहुसंख्य प्रभागांवर मिळालेल्या यशामुळे आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत चांगली रंगत पहायला मिळेल. दरम्यान निवडणूक निकालानंतर शहरात भाजप कार्यकर्त्यांकडून जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. तर पोलिस प्रशासनाकडून नगरपरिषद परिसर तसेच शहरात तगडा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

ओबीसींचा पाठिंबा असलेल्या उमेदवाराला केवळ २५३ मते

ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांच्या सहकाऱ्यांनी गेवराईत येऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारगटाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार बागवान जबीन जानमहंमद यांना प्रत्यक्षात जाहीर पाठिंबा दिला होता. यानंतर ओबीसी समाजाचा पाठिंबा असल्याचा दावा बागवान जबीन जानमहंमद यांच्याकडून निवडणूक प्रचारादरम्यान करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात मतदारांचा त्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. निवडणूक निकालात या उमेदवाराला अवघी २५३ मते मिळाल्याने संबंधित पाठिंब्याची प्रभावीता संशयात आली आहे. ओबीसी समाजाचा ठोस पाठिंबा असल्याचे भासवले गेले असले तरी मतपेटीत मात्र तो दिसून न आल्याने राजकीय वर्तुळात याबाबत चवीने चर्चा सुरु झाली आहे.

## जत, आटपाडीच्या नगराध्यक्षांनी विजयी होताच मानले ना. पंकजाताई मुंडेंचे आभार

**प्रचारा दरम्यान ना. पंकजाताईंनी घेतल्या होत्या सभा**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**

सांगली जिल्ह्यातील जत आणि आटपाडी येथील नगराध्यक्षांनी विजयी होताच राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना फोन करून त्यांचे आभार मानले. तुमच्या आशीर्वादामुळेच आम्हाला हे यश मिळाले अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

सांगली जिल्ह्यातील जत नगरपरिषद निवडणूकीत भाजपचे रविंद्र आरळी तर आटपाडी मध्ये यु टी जाधव नगराध्यक्ष म्हणून चांगल्या मतांनी विजयी झाले. जत मध्ये भाजपचे २४ पैकी १० नगरसेवक तर आटपाडीत १७ पैकी ७ नगरसेवक निवडून आले. या ठिकाणी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवली गेली होती. या दोन्ही ठिकाणी ना. पंकजाताईंनी प्रचार सभा घेतल्या होत्या, त्याला मतदारांचा जोरदार प्रतिसाद मिळाला होता, त्यांच्या सभांमुळे भाजपची सत्ता येण्यास मदत झाली, त्यामुळे विजयी होताच इथल्या दोन्ही नगराध्यक्षांनी काल फोन करून ना. पंकजाताईंचे आभार मानले. पंकजाताईंनी देखील त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.

## जागतिक सहकार वर्षानिमित्त तुळजाभवानी अर्बन च्या उत्कृष्ट सहकार कार्याचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२२ डिसेंबर**

तुळजाभवानी अर्बनसाठी कालचा दिवस कौतुकाची एक थाप देणारा ठरला. महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे येथे, जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील अनुभव, व आव्हाने यावर विचारमंथन घडवून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि. यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या प्रसंगी ठेवीदारांच्या हिताचे रक्षण,पारदर्शक व उत्तरदायी व्यवस्थापन आणि सहकार तत्त्वांचे उत्कृष्ट पालन याची दखल घेत तुळजाभवानी अर्बनचा ग्रीन वर्ल्ड को प्राइड पुरस्काराने गौरव करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट'चे अध्यक्ष मिलिंद काळे ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शेजूळ व सुमित शेंडगे तसेच मुख्य अधिकारी भास्कर गवळी आणि अशोक मगर उपस्थित होते.हा पुरस्कार केवळ आमच्या संस्थेच्या यशाची पावती नाही, तर आमच्या सभासदांचा, ग्राहकांचा आणि खातेदारांचा विश्वास तसेच कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांचे सन्मानचिन्ह आहे. हाच विश्वास आम्हाला भविष्यात नव्या जोमाने काम करण्याची नवी उमेद देत राहील.

## सौ.के.एस.के.महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय गणित दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा

**`तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**

राष्ट्रीय गणित दिनानिमित्त सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड येथे गणित विभागामार्फत विविध शैक्षणिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. भारताचे महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.



हा कार्यक्रम नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा. डॉ. योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ. दीपाताई क्षीरसागर व डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. विश्वंभर देशमाने व डॉ. सुधाकर गुट्टे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला.

या निमित्ताने फॉर्म्युला रायटिंग स्पर्धा ,थोर गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जीवन व कार्यावर आधारित भित्तिपत्रकाचे प्रकाशन, तसेच गणित विषयाचे विविध क्षेत्रांतील महत्त्व या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी गणित विषयाचे शैक्षणिक व व्यावहारिक महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी गणिताकडे केवळ अभ्यासाचा विषय म्हणून न पाहता तर्कशक्ती, अचूकता व समस्या सोडविण्याची क्षमता विकसित करणारे शास्त्र म्हणून पाहावे, असे प्रतिपादन केले.

## बीड जिल्ह्यातील शांतीवन येथे ४५ वे मराठवाडा साहित्य संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ डिसेंबर**

छत्रपती संभाजीनगर येथे आज मराठवाडा साहित्य परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक झाली. याबैठकीत जेष्ठ कवी फ. म. शहाजिंदे यांची शांतीवन ता. शिरुर कासार, जि.बीड येथे होणाया ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली. ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनासाठी शांतीवनचे संस्थापक श्री. दिपक नागरगोजे यांना निमंत्रन होते. त्यांच्या शांतीवन प्रकल्प आर्वी ता. शिरुर कासार, या सेवाभावी सस्स्थेत एप्रिल महिन्यात होईल.

फ.म. शहाजिंदे यांची निधर्मी, आदम, ग्वाही, झोंबणी, शेतकरी इत्यादी कवितासंग्रह, मी तू ही कादंबरी तर सारांश, इत्यर्थ, शब्दबिंब इत्यादी समीक्षाग्रथ, वाकळ, प्रत्यय, अनुभव हे लेखसंग्रह, मराठवाडयातील कविता, पुरचुंडी, मुठभर माती, आशय व अन्वयार्थ, मुस्लिम मराठी साहित्य : प्रेरणा आणि स्वरुप ही संपादने प्रसिध्द आहेत.यापुर्वी ते पाचवे मराठवाडा युवक साहित्य संमेलन, वाकुळणी, जि. जालना, पहिले मुस्लिम मराठी साहित्य संमेलन, निलंगा जि. लातुर, पाचवे पुरोगामी मराठी साहित्य संमेलन, कंधार जि. नांदेड, तिसरे शेकोटी साहित्य संमेलन, धारगळ गोवा इत्यादी साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे त्यांनी भुसविलेली आहेत.

आपल्या लेखनासाठी त्यांना विविध साहित्य संस्थाचे पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. त्यात कवी केशवसुत काव्य पुरस्कार, यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह समितीचा अंबाजोगाई साहित्य पुरस्कार, हमीद दलवाई साहित्य पुरस्कार (मुंबई), मारुती मगर साहित्य सेवा पुरस्कार(लातुर), तुका म्हणे साहित्य पुरस्कार, (बुलढाणा), शिक्षक रत्न पुरस्कार(मुंबई), सुशीलकुमार शिंदे साहित्य गौरव पुरस्कार (सोलापुर) इत्यादींचा समावेश आहे.

त्यांच्या दिर्घ वाङ्मयीन लेखनाचा विचार करुन या ४५ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची एकमताने मराठवाडा साहित्य परिषदेने निवड केली आहे. या बैठकीस अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे, कार्यवाह डॉ. दादा गोरे, कोषाध्यक्ष डॉ. रामचंद्र काळुंखे, सहकार्यवाह डॉ. गणेश मोहिते, डॉ. दिपा क्षीरसागर व कार्यकारिणी सदस्य श्री. कुंडलिक अतकरे, प्रा. किरण सगर, श्री. दगडू लोमटे, श्री. देविदास फुलारी, डॉ. हेमलता पाटील, डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. संजीवनी तडेगावकर, सौ. सरोज देशपांडे, श्री. संजीव कुलकर्णी, श्री. सुभाष कोळकर, श्री. विलास सिंदगीकर, डॉ. समिता जाधव, श्री. श्रीधर नांदेडकर, डॉ. हंसराज जाधव, डॉ. दिलीप बिरुटे, प्रभाकर साळेगावकर, श्री. मोहिब कादरी हे सदस्य उपस्थित होते.

## अंबाजोगाई पिपल्स बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा!

### सहकार क्षेत्रातील उत्कृष्ट योगदानाबद्दल अंबाजोगाई पिपल्स बँकेस मिळाला प्रतिष्ठेचा 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार'

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२२ डिसेंबर**

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस प्रतिष्ठेचा 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' रविवारी प्रदान करण्यात आला आहे. अशी माहिती बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी यांनी दिली आहे. रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी या पुरस्काराचे वितरण पुणे येथे आयोजित 'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

येथील अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ६१२ कोटी ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. नुकतेच बँकेला एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले. यासाठी शहरी सहकारी बँक गटात 'भारतरत्न सहकारिता पुरस्कार - २०२५' ने ही गौरविण्यात आले आहे हे विशेष होय. तसेच आता जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या अंबाजोगाई पिपल्स को-ऑपरेटिव्ह सहकारी बँक लि.अंबाजोगाई या बँकेस प्रतिष्ठेच्या 'ग्रीन वर्ल्ड को-प्राईड २०२५ पुरस्कार' रविवार, दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत सहकार सभागृह, कॉसमॉस सहकारी बँक लि.मुख्य प्रशासकीय कार्यालय, विद्यापीठ रोड, शिवाजीनगर, पुणे या ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या'सहकार मंथन-२०२५' या सहकार परिषदेत मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. जागतिक सहकार वर्षाचे औचित्य साधून सहकार क्षेत्रातील विविध घटकांनी एकत्र येऊन अनुभवविनिमय, विचारमंथन व आगामी दिशानिर्देशासाठी धोरणात्मक चर्चासत्रे आयोजित करण्याच्या उद्देशाने ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन व कॉसमॉस बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन-२०२५' ही सहकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, सहकारी गृह रचना संस्था, सहकारी दूध उत्पादक संघ व सहकारी साखर कारखाने अशा विविध सहकार क्षेत्रातील संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबाजोगाई पिपल्स बँकेने कर्ज वितरणाद्वारे छोट्या उद्योगांना, सूक्ष्म व मध्यम उद्योजकांना, सहकारी संस्था तसेच विविध उद्यमशील व्यक्तींना भांडवल उपलब्ध करून देत त्यांच्या व्यवसाय व उत्पन्न वृद्धीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोलीत भाजपला आत्मचिंतनाची आवश्यकता

## सत्ता असूनही नगराध्यक्षपद गमावले, केवळ ५ नगरसेवकांचा विजय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ डिसेंबर**

नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीत हिंगोलीत भाजपची सत्ता असूनही नगराध्यक्षपद गमवावे लागले तर केवळ ५ ठिकाणी भाजपचे उमेदवार विजयी झाले आहे. नगर पालिकेत शिवसेना शिंदे गटाने नगराध्यक्षपद भाजपकडून खेचून आणीत १७ नगरसेवक निवडून आणले आहेत. दुसऱ्या क्रमांकावर राष्ट्रवादी अजित पवार गटाने १० नगरसेवक निवडून आणले आहेत. माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या नगराध्यक्षपदाच्या काळात हिंगोली शहराचा विकास झाला परंतु या विकासाला जनतेने कौल दिला नाही. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी शहरातील विकासासाठी कोट्यावधीचा निधी आणला परंतु भाजपला नगराध्यक्षपदापासून मुकावे लागले आहे. भाजप प्रचारात कमी पडला असल्याचे बोलले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जाहीर सभा हिंगोलीत झाली मात्र भाजपला पराभवाला सामोरे जावे लागले. भाजपला आत्मचिंतनाची आवश्यकता आहे अन्यथा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही भाजपला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी त्यांचे भाऊ श्रीराम बांगर यांच्या पत्नी सौ रेखा श्रीराम बांगर यांना नगराध्यक्षपदसाठी उभे केले. या निवडणुकीत आक्रमक प्रचार केल्यामुळे रेखा बांगर यांना २३ हजार ८९ मते मिळाली तर भाजपच्या नीता बांगर यांना १२ हजार ६५३ मते मिळाली. भाजपची हिंगोलीत सत्ता आहे. कार्यकर्ते आहेत परंतु भाजपला पराभवाची धुळ चारीत नगराध्यक्षपदासह १७ नगरसेवक निवडुन आणल्यामुळे शिवसेनेचे नगर पालिकेवर निर्विवाद वर्चस्व निर्माण झाले आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या आमीनाबी शे अजीज प्यारेवाले यांनीही ७ हजार २२ मते मिळवली. महायुतीतील सर्वच पक्षांनी त्यांचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार उभा केल्यामुळे मतांचे विभाजन झाले तर दुसरीकडे उबाठा शिवसेनेच्या उमदेवार अर्चना श्रीराम भिसे यांना केवळ ३ हजार ३८४ मते मिळाली. या मतदानाचे विश्लेषण केले असता काँग्रेस, उबाठा शिवसेना आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने आक्रमकतेने प्रचार करूनही त्यांना मुस्लीम मतदार वळविता आला नाही.

शिवसेनेचे आ. संतोष बांगर आणि भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी प्रचारादरम्यान एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत निवडणुकीत चुरस निर्माण केली. भाजपने शहराचा विकास केला या मुद्यावर भाजप न राहता त्यांनी अवैध धंद्यांवर तसेच वैयक्तिक टीकेवर जोर दिला. मात्र त्यांची ही खेळी यशय्वी झाली नाही. ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेमध्ये भाजप, राष्ट्रवादीचे पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला. याचा परिणामही भाजपवर झाला. शिवसेनेने नगराध्यक्षपदासह त्यांच्या नगरसेवकांना बळ दिले. तसेच घरोघरी प्रचार करीत मतदारांना आकर्षिक केले. दुसरीकडे भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी चमडी बचाव धोरण स्विकारले. निष्ठावंतांना उमेदवारी न दिल्याचा फटकाही भाजपला या निवडणुकीत बसला आहे. शिवसेनेप्रमाणे कार्यकर्त्यांना बळ देण्यात भाजप कमी पडले. स्थानिक नेते काही मोजक्याच पदाधिकारी व कार्यकर्त्यांना बळ देत असल्याचा राग भाजप निष्ठावंतांच्या मनात आहे. त्यातही प्रचार यंत्रणा कमी पडल्यामुळे भाजपला या निवडणुकीत दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

दुसरीकडे शिवसेनेने शहरातील मुस्लीम बहुल भागात तसेच झोपडपट्टी भागात दिवसरात्र कार्यकर्ते लावून प्रचाराचा वेग वाढवला. जिल्ह्यातील कळमनुरी आणि वसमत नगर पालिकेवरही भाजपला सत्ता असूनही पाहीजे तसे यश मिळवता आले नाही. आगामी जि प, पं स निवडणुकीत भाजपला चांगलीच कसरत करावी लागणार आहे.



हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर निगरसेवक कपील खंडेलवाल आणि नगरसेविका सुरभी भरत चौधरी यांना प्रमाणपत्र देतांना मुख्याधिकारी अरविंद मुंडे दिसत आहेत. यावेळी गोविंद पहेलवान यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते. छाया– विजय गुंडेकर

# भोसीत ६५ हजारांच्या कर्जापायी शेतकऱ्याची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ डिसेंबर**

कळमनुरी तालुक्यातील भोसी येथे ६५ हजाराच्या कर्जापोटी तरूण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी तालुक्यातील भोसी येथील शेतकरी सुदर्शन काशीनाथ अवचार वय ३५ यांना त्यांच्या वडीलांच्या नावे अडीच एकर जमीन आहे. या जमिनीवर त्यांच्या वडीलांनी महाराष्ट्र ग्रामीण बँक वारंगाफाटा शाखेकडून ६५ हजार रूपयांचे कर्ज घेतले होते. खरीप हंगामातील पीक आल्यानंतर कर्ज फेडले जाईल असे कुटुंबियांनी सांगितले होते त्यानुसार खरीप हंगामात त्यांनी सोयाबीन, तुर व इतर पिकांची पेरणी केली होती. मात्र हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले. जमीन खरडून गेल्याने पीकेही वाहून गेली. त्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. खरीपाचे पीक हातचे गेल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, बँकेचे कर्ज कसे फेडायचे याची चिंता त्यांना लागली होती.

दरम्यान दि १७ डिसेंबर रोजी त्यांचे कुटुंबीय शेतात गेले असता घरी सुदर्शन हे एकटेच होते. त्यावेळी त्यांना नापिकी आणि कर्ज या चिंतेतून गळफास घेवून आत्महत्या केली. दुपारच्या सुमारास त्यांची पत्नी घरी आली असतांना सुदर्शन यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या प्रकाराची माहीती मिळाल्यानंतर आखाडा बाळापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक विष्णुकांत गुठ्ठे, जमादार शेख यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणी रूखमा अवचार यांनी दिलेल्या माहीतीवरून आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत सुदर्शन यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. या धटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे.

# हिंगोलीत भागवत सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता


**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ डिसेंबर**




शहरालगत असलेल्या बळसोंड ग्राम पंचायत अंतर्गत संत नामदेव नगरामध्ये विघ्नहर्ता गणपती मंदिर या ठिकाणी अखंड हरिनाम सप्ताह संगीत भागवत ज्ञान यज्ञ, ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला रविवार पासून सुरू झाला या ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व भागवत सप्ताहत महिला मंडळी कडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. काल्याचे किर्तनाने या सप्ताहाची सांगता झाली.

स्व. हभप आत्माराम महाराज पटवे यांच्या आशीर्वादाने दर वर्षी प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह संगीत भागवत ज्ञानयज्ञ सोहळ्याचे विघ्नहर्ता गणपती मंदिरात आयोजन केले आहे. हा सोहळा संत नामदेव नगर बळसोंड येथे पार पडला. दरम्यान, सकाळी पाच ते सहा काकडा भजन, आठ ते साडेआठ यजमानाचे हस्ते श्री ची पूजा, दहा ते बारा सामुदायिक नामजप पुरुष व महिला, दुपारी एक ते पाच ह.भ.प.सर्वेश शुक्ल महाराज यांचे भागवत कथा, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ, रात्री आठ ते दहा हरिकीर्तन झाले आहे. या कीर्तनास मोठ्या प्रमाणावर भाविक भक्तांनी प्रतिसाद मिळाला त्यामुळे या भागातील वातावरण भक्तिमय झाले होते.

ह.भ.प. सर्वेश महाराज शुक्ल यांचे काल्याचे किर्तन होऊन भव्य महाप्रसादाने या भागवत सप्ताहाची सांगता झाली. यावेळी मंडळाचे संस्थापक आत्माराम जाधव, विश्वनाथराव केंद्रेकर, गोपालराव सरनायक, विलासराव सरनाईक, दिलीपराव पळसकर, सोपान सांगळे, राजू पाटील यांच्यासह संत नामदेव नगर छत्रपती संभाजीनगर पंढरपूर नगर आनंद नगर शिक्षकांनी रामकृष्ण कॉलनी, बळसोंड या भागातील भाविक भक्तांनी परिश्रम घेतले.



हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक हमीद प्यारेवाले यांचा सत्कार भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केला. यावेळी शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. छाया– लखन यादव

## संक्षिप्त वृत्त

### बुधवारी तपस्या भवनाचे हिंगोलीत उद्‌घाटन

हिंगोली– अकोला बायपास परिसरात असलेल्या प्रजापिता बरह्मा कुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या तपश्या भवनाचे उदघाटन बुधवारी २४ डिसेंबर रोजी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्याच्या प्रभारी असलेल्या राजयोगिनी संतोष दीदी, नांदेड, हिंगोलीच्या जिल्हा प्रभारी शिवकन्या बहनजी यांच्या हस्ते सकाळी अकरा वाजता होणार आहे. यावेळी खासदार नागेश पाटील आष्टीकर, आमदार हेमंत पाटील, आमदार तानाजी मुटकुळे, जिल्हाप्रमुख संदेश देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दरम्यान, सकाळी अकरा वाजता तपश्या भवनाचे उदघाट्न होईल त्यानंतर साडे अकरा ते एक यावेळेत आशीर्वचन होणार आहे. या कार्यक्रमाला नांदेड, परभणी, हिंगोली सह इतर जिल्ह्यातील प्रजा पिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातील अनेक भावीकांची उपस्थिती राहणार आहे. जवळ पास एक हजार पेक्षा अधिक भविकांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संचालिका ब्रम्हाकुमारीज अर्चना बहेनजी, यांच्यासह ब्रम्हाकुमारी परिवार यांनी केले आहे.

### नूतन नगराध्यक्ष, नगरसेवकांचा आज सत्कार

हिंगोली– येथील नगर पालिकेच्या नवीन प्रशासकीय कार्यालयातील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात दि २३ डिसेंबर रोजी नूतन नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर यांच्यासह सर्व नगरसेवकांचा सत्काराचे आयोजन करण्यात आले असून मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सभागृहात फर्निचर आदी साहीत्याची पाहणी करण्यात आली.

# नाईक नगर येथे भव्य आरोग्य शिबीरात ५०० जणांची आरोग्य तपासणी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ डिसेंबर**

श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा व अखंड हरिनाम सप्ताह निमित्ताने नाईक नगर हिंगोली येथे भव्य मोफत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिराला परिसरातील साधारणता ५०० नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शिबिरात डॉ. यशवंत पवार, डॉ. नितीन पायघन, डॉ. अरुण काळे, डॉ. प्रतीक लखमावर, डॉ. नागेश पिंपरे यांनी मोफत तपासणी करून पुढील सल्ला दिला.

हे शिबिर रविवार, २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत पार पडले. शिबिरामध्ये विविध आजारांवरील तपासणी व तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला देण्यात आला. शिबिरामध्ये सर्वसाधारण आजार, मधुमेह, रक्तदाब, मूत्रविकार, हाडांचे विकार तसेच नेत्रतपासणी करण्यात आली. अनेक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला व तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य उपचार व मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयीजनजागृतीहोण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सप्ताह समिती, डॉ गणेश अंभोरे, नागेश शिंदे, नितीन शिंदे आदींचे सहकार्य लाभले.



हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर प्रमाणपत्र स्विकारतांना राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक दिलीप चव्हाण, आमेर अली, अमित कळासरे, गणेश लुंगे यांच्यासह उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, मुख्याधिकारी अरविंद मुंडे दिसत आहेत. छाया– विजय गुंडेकर



हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर प्रमाणपत्र स्विकारतांना शिवसेनेचे प्रभाग क्रमांक ९ चे उमेदवार अब्दुल माबुद बागवान दिसत आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, मुख्याधिकारी अरविंद मुंडे. छाया– विजय गुंडेकर

# शांताबाई दराडे विद्यालयात रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय गणित दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ डिसेंबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथे गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जन्मदिना निमित्त राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला.

रामानुजन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यानिमित्त विद्यार्थ्यांची व अध्यापकांची समायोजित भाषणे झाली. यामध्ये गणित अध्यापक श्री अमोल कान्हेड व नागनाथ सोळंके यांनी शीनिवास रामानुजन यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला तसेच गणिताचे आपल्या जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितले. नकुल गोटरे या विद्यार्थ्याने वर्गमूळ व घनमूळ सोप्या पद्धतीने काढण्यासंबंधी माहिती दिली. तसेच विद्यार्थिनी कुमारी रुद्रायणी, श्रुतिका शिंदे व समीक्षा लोणकर यांनी गणिती उखाणे विद्यार्थ्यां सांगून गणिताच्या अभ्यासाची रंजकता कशी वाढवली जाते याबद्दल माहिती दिली.



तसेच याप्रसंगी विविध सूत्र पाठांतर संबंधी भित्तिपत्रके तयार करून गणित विषयाचे प्रदर्शन तयार केले. याबरोबरच विद्यालयाच्या वतीने गणित दिनानिमित्त गणित फेरी काढून जनजागृती करण्यात आली. या फेरीमध्ये प्रेम पाईकराव विद्यार्थ्यामार्फत गणित रोबोट तयार करून गणिताबद्दल उत्सुकता निर्माण केली गेली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ प्रकाश अंभोरे उपस्थित होते.कार्यक्रमाला विद्यालयातील पर्यवेक्षक श्री अनिल लोळेवार व पर्यवेक्षक श्री भारत शिंदे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी गणित अध्यापक राजकुमार बांगर, आनंद मस्के, जयश्री धुमाळ, नागनाथ सोळंके, अमोल कान्हेड यांनी प्रयत्न केले.



हिंगोली– हिंगोली नगर पालिका निवडणुकीत विजयानंतर शिवसेनेचे नगरसेवक चंदु लव्हाळे यांना प्रमाणपत्र देताना उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, मुख्याधिकारी अरविंद मुंडे यावेळी पवन मंडले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. छाया– विजय गुंडेकर

# होट्टल रस्त्यावर अवघ्या चार दिवसांत पाच अपघात; एक ठार, अनेकजण जखमी

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २२ डिसेंबर-**

देगलूर तालुक्यातील होट्टल फाटी ते हॉटेल आणि पुढे करडखेड गावाजवळपास रस्ता नुकताच नव्याने तयार करण्यात आला असून दळणवळणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा ठरला आहे. मात्र रस्ता चांगला आणि रुंद झाल्याने भरधाव वाहनाची संख्या वाढली. त्यामुळे अवघ्या चार दिवसांत या मार्गावर पाच अपघात घडले असून त्यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला, तर इतर अनेकजण जखमी अवस्थेत उपचार घेत आहेत.





दरम्यान देगलूर ते होट्टल मार्गावरील लिंगनकेरुर चढावाजवळ भरधाव दुचाकी वाहनांच्या झालेल्या अपघातात एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला असून दोघांचा उपचार चालू असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच कुशावाडी गावाजवळ दोन अपघात, तर काठेवाडी गावाच्या आसपास दोन अपघात घडल्याची नोंद आहे. याअपघातांच्या या मालिकेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अवघ्या चार दिवसांत घडलेल्या पाच अपघातात अनेकजण जखमी झाले आहेत. हा रस्ता चांगल्या दर्जाचा झाल्याने येरगी, देवापूर, होट्टल, माळेगाव (मक्ता), झरी, मरखेल, गवंडगाव, काठेवाडी, शिवणी, आदी गावांतील प्रवासी मोठ्या प्रमाणात या मार्गाचा वापर करत आहेत. मात्र वेगावर नियंत्रण नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

लिंगनकेरुर चढावाजवळ अतिवृष्टीमुळे रस्त्याची एक बाजू खचली आहे. याठिकाणी केवळ दगडाचे निशाणी करण्यात आले आहे, त्यामुळे अशा धोकादायक ठिकाणी तातडीने तटबंदी उभारणे अत्यावश्यक असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. अतिवृष्टी होऊन जवळपास दोन - तीन महिने उलटली तरी प्रशासनाकडून ठोस भूमिका घेण्यात आली नाही, यामुळे नागरिकांत नाराजी पसरली आहे. या मार्गावरील अपघाताचे सत्र थांबविण्यासाठी गतिरोधक (स्पीड ब्रेकर), सूचना फलक, वेगमर्यादा फलक व संरक्षण भिंती उभाराव्यात अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासन या समस्येकडे गांभीर्याने लक्ष नाही दिल्यास भविष्यातही अपघातांची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. आतातरी प्रशासन जागे होणार का? लिंगनकेरुर चढावाजवळील तटबंदी आणि दिशादर्शक फलके लावणार का? गतीरोधक उभारुन भरधाव वाहनाच्या गतीला आळा घालण्यार का ? की आणखी बळी गेल्यानंतरच उपाययोजना केल्या जाणार, असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करीत आहेत.

# सामान्य माणूस शिवसेनेशी जोडला गेला : बबन थोरात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ डिसेंबर-**

पक्ष फुटीनंतर शिवसैनिकांनी मेहनत करुन लोकांना साथ देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सामान्य माणसे शिवसेनेसोबत जोडली गेली असून, त्याचाच प्रत्यय या निवडणुकीत आला असून, या निवडणुकीत शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने एक नगराध्यक्ष, १४ नगरसेवक व चार शिवसेना पुरस्कृत असा एकूण १८ जागेवर विजय मिळविला असल्याची माहिती शिवसेनेचे उपनेते तथा संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेस लातूरचे संपर्कप्रमुख तथा माजी आमदार रोहिदास चव्हाण, सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, उपजिल्हाप्रमुख विजय बगाटे, महानगरप्रमुख प्रकाश मारावार, धोंडू पाटील आदींची उपस्थिती होती.

पुढे बोलताना संपर्कप्रमुख बबनराव थोरात म्हणाले की, होऊ घातलेल्या महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना पक्षाला अपेक्षेपेक्षा जास्त प्रतिसाद मिळत आहे. २० प्रभाग, ८१ वार्ड यासाठी जवळपास १५० जणांनी मुलाखती दिल्या आहेत. खासदार नागेश पाटील आष्टीकर, माजी आमदार रोहिदास चव्हाण, माजी आमदार अनुसया खेडकर, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, जिल्हाप्रमुख बबन बारसे, महानगरप्रमुख प्रकाश मारावार यांनी या इच्छूकांच्या मुलाखती घेतल्या आहेत. नगरपंचायत, नगर परिषद निवडणूकांप्रमाणेच शिवसेना मनपा निवडणुकीतही हिमतीने लढेल, असा विश्वास व्यक्त करत महाविकास आघाडी घटक पक्षांशी चर्चा सुरु असून, सन्मानकारक जागा मिळाल्यास सोबत अन्यथा स्वबळावर देखील लढण्याची आमची तयारी आहे.

जिल्ह्यात भाजपाचे सर्वाधिक आमदार असताना याठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने सर्वात जास्त जागा मिळविल्या. तर शिंदे गटाचे चार आमदार असतानाही एकही नगराध्यक्ष त्यांना निवडून आणता आला नाही.उलटपक्षी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने एक नगराध्यक्ष, १४ नगरसेवक व चार पुरस्कृत असे एकूण १८ जागांवर विजय मिळविला. तर शिंदे गटाला केवळ १५ जागेवर विजय मिळविता आला.

कुणी काय केल यापेक्षा दैनंदिन गरजा भागविण्यासाठी शिवसेना पक्ष सक्षम आहे. पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री असताना केलेली कामे जनतेने पाहिली आहेत, त्याचप्रमाणे शिवसैनिक देखील जनतेची निरपेक्षपणे सेवा करतील, यात काही शंका नाही. त्यामुळे या शिवसैनिकांना सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन संपर्कप्रमुख बबनराव थोरात यांनी जनतेला केले.

## डॉ. बालाजी झटकोडे यांना राज्यस्तरीय 'वैद्यकीय सेवा रत्न पुरस्कार'


**बाऱ्हाळी** -कै. त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीरच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा २०२५ साठी डॉ. बालाजी गंगाधर झटकोडे यांना 'वैद्यकीय सेवा रत्न पुरस्कार' प्रदान करून पुरस्कारार्थी म्हणून निवड करण्यात आली आहे. मुखेड



तालुक्यातील मौजे दापका गुंडोपंत येथील डॉ. बालाजी झटकोडे यांनी वैद्यकीय सेवा हीच ईश्वरसेवा मानून अनेक वर्षांपासून ग्रामीण भागात सातत्याने समाजोपयोगी रुग्णसेवा केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना अत्यल्प दरात उपचार देत त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन कै. त्र्यंबकआप्पा माळेवाडे प्रतिष्ठान, उदगीरच्या वतीने त्यांना 'वैद्यकीय सेवा रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. हा भव्य पुरस्कार सोहळा गुरुवार २५ डिसेंबर रोजी दुपारी २ वा. ललित भवन मंगल कार्यालय, नळेगाव रोड, उदगीर येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील हे राहणार असून लातूर जिल्ह्याचे खासदार मा. शिवाजी काळगे हे उद्घाटक म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजू भाऊ बनसोडे, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन भातलवंडे, उदगीर नगर परिषदेचे मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ. बालाजी झटकोडे यांच्या या सन्मानाबद्दल मुक्रमाबाद, बाऱ्हाळी, दापका विभागातून तसेच वैद्यकीय क्षेत्रातून तसेच सामाजिक परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## रमेश वडगावे विद्यूत सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी बिन विरोध

**नायगाव**-विद्युत कामगारांच्या आर्थिक सबलीकरणासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या नांदेड विज कामगार को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांची निवडणूक नांदेड येथे अत्यंत



उत्साह व सकारात्मक वातावरणात पार पडली. या निवडणुकीत सर्व सदस्यांचा विश्वास संपादन करत रमेश गोविंद वडगांवे नरसी कर यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. सहकार क्षेत्रातील अनुभव, कामगार हिताची स्पष्ट भूमिका आणि संघटनात्मक नेतृत्वगुण यामुळे वडगांवे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीची अधिकृत घोषणा सहकारी संस्था निबंधक के. एस. बरकुल, सहाय्यक निबंधक (पी) व जिल्हा उपनिबंधक, नांदेड यांच्या उपस्थिती मध्ये करण्यात आली. याचवेळी कैलाश राऊत यांची उपाध्यक्षपदी तर सतीश वाघमारे यांची मानद सचिवपदी बिनविरोध निवड झाली. निवडणुकीचे निकाल जाहीर होताच सभागृहात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला आणि उपस्थितांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर मोठ्या आनंदाने शुभेच्छांचा वर्षाव केला. या निवडणूक प्रक्रिये वेळी अविनाश रामगिरवार, ईश्वरसिंह टेलर, धोंडीबा गोत्रम, सतीश निशंकर, बालाजी स्वामी,राजेश सोनकांबळे,सचिन सोनसले, संचालक राजनंदिनी सोनकांबळे यांची विशेष उपस्थिती होती. तसेच कार्यालय अधीक्षक प्रकाश देशमुख, संघटनेचे ज्येष्ठ नेते पंडित तेलंग, हरप्रीतसिंग तब्बेवाले, श्रीकांत राठोड, लक्ष्मीकांत चनापुरे, किरण डर्नासे, महेश चांदोलकर, माधव गोरकावड, बालाजी कदम आदी उपस्थित होते.

## श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल सगरोळी येथे २००४ व २००६ बॅचचे स्नेहमिलन

**बिलोली** -संस्कृती संवर्धन मंडळ, शारदानगर सगरोळी संचलित श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल, सगरोळी येथील इयत्ता १० वी २००४ व १२ वी २००६ बॅच च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन कार्यक्रम दिनांक २१ डिसेंबर २०२५ रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात पार पडला. तब्बल २१ वर्षांनंतर एकत्र आलेल्या विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय प्रमोदजी देशमुख, चेअरमन संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी हे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात शालेय जीवनाचे महत्त्व, शिस्त व मूल्यांची जपणूक याबाबत मोलाचे विचार व्यक्त केले. या स्नेहमिलन प्रसंगी शाळेतील माजी गुरुजन कोकंडकर, पेटकर, आकाश शिंदे सर, डी. जी. बामणे, यू. डी. शिंदे सर, विभुते, वट्टमवार, आलुरकर, गायकवाड व ओतारी यांचा सन्मान करण्यात आला. गुरुजनांविषयी कृतज्ञता व्यक्त करताना अनेक विद्यार्थी भावूक झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाधर फुलारी यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. या स्नेहमिलन कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संतोष उलगडे, नागेश माचपुरे, नंदलाल वाघमारे, शिवशंकर पाटील, यालमलवार पोशट्टी व विनोद शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध कार्यामुळे हा स्नेहमिलन सोहळा अत्यंत संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी भविष्यातही अशा प्रकारचे स्नेहमिलन उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# माळेगाव यात्रेत विविध माहितीचे स्टॉल्स

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ डिसेंबर-**

श्रीक्षेत्र माळेगाव यात्रेनिमित्त जिल्हा परिषद नांदेड अंतर्गत विविध विभागांच्या वतीने उभारण्यात आलेल्या प्रदर्शनांनी यात्रेकरूंचे लक्ष वेधून घेतले आहे. एकात्मिक बालविकास प्रकल्प, समाज कल्याण विभाग तसेच महिला व बालविकास विभाग यांच्या स्टॉल्सना भाविकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

एकात्मिक बालविकास प्रकल्पाचे भव्य प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनात जिल्ह्यातील १६ तालुक्यांतील अंगणवाडी सेविकांनी सहभाग घेतला होता. दररोज चार तालुक्यांतील अंगणवाड्यांचा सहभाग या ठिकाणी नोंदवण्यात आला.

या प्रदर्शनामध्ये पौष्टिक आहार व त्याच्या रेसिपी, कडधान्यांचे महत्त्व, गूळ-शेंगदाणे, तीळ लाडू, विविध पराठे, शेवगा व भाजीपाल्याचे पोषणमूल्य, गरोदर महिला व किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच लेक लाडकी योजना, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, परसबागेचे पाच फायदे, माझी पोषणाची गोष्ट या योजनांची माहिती फलकांच्या माध्यमातून देण्यात आली.

या प्रदर्शनात अंगणवाडी कार्यकर्ती काशीबाई लोंढे यांनी सोयाबीनपासून दूध व दही तयार करून प्रदर्शनात ठेवले होते. हे पदार्थ अत्यंत पौष्टिक असून लहान मुलांसाठी उपयुक्त असल्याचे त्यांनी सांगितले.

या विभागाच्या वतीने सुदृढ बालक स्पर्धा व मेंहदी स्पर्धा घेण्यात आल्या. उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली बालविकास प्रकल्प अधिकारी, विस्तार अधिकारी, सुपरवायझर व कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

**समाज कल्याण विभाग**

समाज कल्याण विभागाच्या वतीने माळेगाव यात्रेत स्वतंत्र प्रदर्शन भरवण्यात आले. या ठिकाणी विभागाच्या विविध योजना तसेच दिव्यांग कल्याण योजनांची माहिती देण्यात आली. यासोबतच विविध विषयांवरील परिपत्रकांचे वाटप करण्यात आले.

**महिला व बालविकास विभाग**

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत भरवण्यात आलेल्या प्रदर्शनात जिल्हा बाल संरक्षण कक्ष, बालविवाह मुक्त नांदेड विषयक जनजागृती फलक, चाइल्ड हेल्पलाइन १०९८ ची माहिती प्रदर्शित करण्यात आली होती. तसेच महिला व बालविकास विभागाच्या विविध योजना, बालगृहे, शिशुगृहे, बालकल्याण समिती, एकात्मिक बाल संरक्षण योजना, बालकांविषयीचे कायदे, महिला समुपदेशन केंद्र, तसेच कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा व हुंडा प्रतिबंध कायदा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रदर्शनातून संरक्षण अधिकारी आशिष दुधमल, धनाजी कोंडेवार व मनोज बसवंते यांनी भाविकांना मार्गदर्शन केले.

माळेगाव यात्रेत भरवण्यात आलेली ही सर्व प्रदर्शने जनजागृती, पोषण, महिला-बाल संरक्षण व सामाजिक कल्याण या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरत असून भाविकांकडून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**पाणलोट क्षेत्र विकास**

तालुका कृषी अधिकारी लोहा यांच्या वतीने पाणलोट क्षेत्र व शिल्लक क्षेत्र व्यवस्थापनावर आधारित माहितीपूर्ण प्रदर्शन भरवण्यात आले होते. 'माथा ते पायथा' या संकल्पनेनुसार पाणी मुरवणे, पाणी संकलन, विहीर पुनर्भरण, ठिबक सिंचन, सौर ऊर्जा वापर व पाणी अडवण्यासाठी चर यांचा प्रत्यक्ष देखाव्याद्वारे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. तसेच कृषी विभागाचे महावितरण प, फळबाग लागवड, कृषी संजीवनी, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली. पाणलोट क्षेत्रावर आधारित तयार केलेला हा देखावा यात्रेतील विशेष आकर्षण ठरला.

# हिमायतनगर नगरपंचायतीवर कॉंग्रेसचे वर्चस्व

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २२ डिसेंबर-**

हिमायतनगर नगरपंचायतीवर कॉंग्रेसने निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. १७ जागा पैकी ८ जागा जिंकत कॉंग्रेस ने नगरपंचायतीवर आपला झेंडा फडकावला आहे. प्रथमच पार पडलेल्या थेट नगराध्यक्ष पदांच्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार शेख रफिक शेख महेबुब यांनी बाजी मारली असून त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपचे डॉ. राजेंद्र वानखेडे यांचा त्यांनी पराभव केला आहे. व तसेच शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार रामभाऊ ठाकरे यांना तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली आहेत. २०१५ ची पुनरावृत्ती येथे झाली असून कॉंग्रेस येथे एक नंबरचा पक्ष ठरला आहे.

हिमायतनगर नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्ष पदाचे शेख रफिक शेख महेबुब हे १ हजार ६ ७१ अधिकचे मते घेऊन विजयी झाले आहेत. तर नगरसेवक पदाच्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ( १ )मधून भाजपच्या चायल दर्शना शरद या २९७ मते घेऊन विजयी झाल्या आहेत. तर त्यांच्या प्रतिस्पर्धी शिवसेना शिंदे गटाच्या दासेवार सुनंदा नागेश ११३ दोन क्रमांकाची मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक ( २ ) मधून गुंडेवार विनोद गणपत हे ३३९ मते घेऊन विजयी झाले आहेत.तर त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट मोहम्मद जावीद हाजी अ गण्णी ३२१ मते प्राप्त झाली असून, प्रभाग क्रमांक ( ३ ) मधून कॉंग्रेस पक्षाचे अब्दुल कंजूल फिर्दोस हक्क हे २९२ मते घेऊन विजयी झाले आहेत.तर त्यांचे प्रतिस्पर्धी अपक्ष उमेदवार अब्दुल साजीया सना बाखी यांना २२६ मते प्राप्त झाली असून त्यांचा येथे पराभव झाला आहे. प्रभाग क्रमांक ( ४ ) मध्ये मेंडके कमल संभाजी पक्ष कॉंग्रेस ३५५ मते मिळवून विजयी झाल्या तर त्यांच्या प्रतिस्पर्धी डुडूळे सुशिलाबाई नागेश यांना २७९ क्रमांक दोन ची मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक ( ५ ) हसिना बेगम अब्दुल सलाम या कॉंग्रेस पार्टी च्या उमेदवार ४३० मतांनी विजयी झाल्या आहेत.तर त्यांच्या प्रती स्पर्धी रजियाबी शेख याकूब २१४ यांचा पराभव झाला आहे. प्रभाग क्रमांक ( ६ ) येथे शिवसेना शिंदे गटाच्या अरूणा भगवान मुदेवाड ३४२ मते प्राप्त करून विजयी झाल्या आहेत. तर त्यांच्या प्रतिस्पर्धी जान्हवी संतोष जिचकर कॉंग्रेस २६६ मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक ( ७ ) मधून दर्शना रमेश पंडीत कॉंग्रेस १५७ मते घेऊन विजयी तर त्यांच्या प्रतिस्पर्धी शिवसेना शिंदे गट बनसोडे अनिता राजकुमार यांना १२३ मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक ( ८ ) मिर्झा जिशान बेग मिर्झा इसा बेग ४२२ मते उबाठा शिवसेना विजयी तर कॉंग्रेस ज्ञानेश्वर शेषेराव शिंदे यांना ४०२ मते, प्रभाग क्रमांक ( ९ ) भाजपच्या सुचिता कुणाल राठोड ह्या ४४२ मते घेऊन विजयी झाल्या आहेत. तर मुधोळकर इंदिरा पंकज १८४ पराभूत झाल्या आहेत. प्रभाग क्रमांक ( १० ) अशिष बाबुराव सकवान भाजप २९४ विजयी तर इथे नरवाडे श्रिराम गणपती व पाळजकर गजानन दत्तात्रय ११८ समान मते मिळाली आहेत. प्रभाग क्रमांक ( ११ ) डाके भारत माधवराव मते २५९ विजयी तर कटारे मारोती पुंजाराम २३७ मते, प्रभाग क्रमांक ( १२ ) ठाकरे विठ्ठल भिमराव उबाठा शिवसेना ४४१ मते विजयी तर कॉंग्रेस संजय ग्यानोबा माने २८४ पराभूत झाले आहेत. प्रभाग क्रमांक ( १३ ) पठाण सरदार खान खलील खान राष्ट्रवादी शरद पवार गट ५१४ मतांनी विजयी तर शेख नबीसाब अ कादर ४७६ मते पराभूत, प्रभाग क्रमांक ( १४ ) म. मुजतबा मतिन कॉंग्रेस ३३० विजयी मुबाशिरा फातेमा शेख सलीम ३०१ मते पराभूत, प्रभाग क्रमांक ( १५ ) शेख सलमाबी इलीयास कॉंग्रेस ३०७ मतांनी विजयी तर राष्ट्रवादी अजित पवार गट शेख नुरजाहाबी शेख गण्णी २३६ पराभूत, प्रभाग क्रमांक ( १६ ) कॉंग्रेसच्या सलमाखानम समदखान ८४३ मतांनी विजयी शैख उजमा परवीन शेख साकीर अहेमद २२५ मते, तर प्रभाग क्रमांक ( १७ ) मधून शिवसेना शिंदे गटाचे सुभाष पोतन्ना बलपेलवाड २७९ मते घेऊन विजयी तर मिर्झा जाहीर बेग हातबेग यांना २७१ मते मिळाली आहेत. यावेळी पोलीस प्रशासनाकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला.

## सचिन खंडागळे यांना पीएचडी पदवी प्रदान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ डिसेंबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून सचिन नारायण खंडागळे यांना जनसंवाद व वृत्तपत्रविद्या या विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी सहयाद्री वाहिनीवरील कृषिसंवाद : एक विश्लेषणात्मक अभ्यास या विषयावर सखोल संशोधन करून ही पदवी प्राप्त केली.

या संशोधनातून कृषिविषयक माध्यमसंवादाची भूमिका, शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्याची प्रभावीता आणि प्रसारमाध्यमांचा सामाजिक-आर्थिक विकासातील सहभाग यांचा शास्त्रीय आढावा घेण्यात आला आहे. माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक व प्राध्यापक डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी या संशोधनाचे मार्गदर्शन केले.

सचिन खंडागळे यांच्या या यशाबद्दल अनेक मान्यवर व मित्रपरिवाराने अभिनंदन केले.

# जालंधर, पंजाब पोलीस, मुंबई संघाचा मोठा विजय! मुंबईने पाडला गोलांचा पाऊस!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ डिसेंबर-**

येथे सुरु असलेल्या श्री गुरु गोबिंद सिंघजी गोल्ड अँड सिल्वर कप हॉकी टूर्नामेंटच्या तिसऱ्या दिवशी आर्मी जालंधर आणि एमपीटी मुंबई संघाने गोलांचा पाऊस पाडून स्पर्धेत श्रोत्यांची मने जिंकली. तर बीएसएफ जालंधर संघाने इलेवन स्टार अमरावती संघाचा आणि पंजाब पोलीस ने अमरावती संघाचा दारुण पराभव केला.

सोमवारी सकाळी स्पर्धे चा दहावा लीग हॉकी सामना बीएसएफ जालंधर आणी इलेवन स्टार अमरावती संघा दरम्यान खेळला गेला. जालंधर संघाने हा सामना ३ विरुद्ध १ गोल अंतराने जिंकला. खेळाच्या सुरुवातीला ८ व्या मिनिटाला अमरावतीच्या उजैर मोहम्मद याने पेनल्टी कार्नर मध्ये गोल नोंदवला. बीएसएफ जालंधर संघाने १७ व्या मिनिटाला मिळालेल्या पेनल्टी कॉर्नरचे अमरबीर सिंघ याने गोल मध्ये रूपांतर करत बरोबरी साधली. नंतर १८ व्या मिनिटाला पुन्हा अमरबीर याने गोल करत आघाडी मिळवली. खेळाच्या ४० व्या मिनिटाला दलजीतसिंघ याने मैदानी गोल केला.

सोमवारी दूसरा सामना एमपीटी मुंबई आणी चार साहिबजादे हॉकी अकैडमी नांदेड संघात खेळला गेला. मुंबई संघाने सामन्यात गोलांचा पाऊस पाडत सामना एकतर्फा ठरवला. एमपीटी मुंबई संघाने वरील सामना १८ विरुद्ध ० अंतराने खिश्यात घातला. मुंबई तर्फे स्टेपन स्वामी याने सात गोल केले तर दीपक सोरेन याने सहा गोल केले. अथर्व कांबळे याने दोन गोल केले तर रामकुमार वेट्टी, प्रशांत राजपूत आणी विवेक पॉल यांनी प्रत्येकी एक गोल केलेत.


त्यानंतर झालेल्या एका सामन्यात आर्मी जालंधर संघाने हॉकी इटारसी संघाचा ८ विरुद्ध ० गोलाने मोठा पराभव केला. सामन्यात सूरज बोतलंदा याने दोन गोल केले. तर मनीष राजबहार, जसकरण केनाथ, संकेत पाटिल, रमनदीपसिंघ आणि मनिंदरसिंघ यांनी प्रत्येकी एक-एक गोल नोंदवला.

आज दुपारी पंजाब पोलीस विरुद्ध सुफियाना क्लब अमरावती संघात सामना खेळला गेला. पंजाब पोलीस संघाने हा सामना ५ विरुद्ध १ गोल अंतराने जिंकला. पंजाब संघातर्फे सिमरनजीतिसिंघ आणी वरिंदर सिंघ यांनी प्रत्येकी दोन-दोन गोल केलेत. तर बलविंदर सिंघ याने एक सुरेख मैदानी गोल केला. सुफियाना क्लब अमरावती तर्फे ज़ीशान बेग याने एकमात्र गोल केला. आज १४ वा लीग सामना ए. जी. नागपुर संघ आणी सैफई इटावा संघा दरम्यान खेळला गेला आणी अनिर्णीत राहिला. नागपुर तर्फे सागर नंदा याने ९ व्या मिनिटाला गोल केले तर इटावा संघाच्या हिमांशु राजबहार याने ४९ व्या मिनिटाला गोल केले. सामना संपला तेव्हा दोन्ही संघ बोरोबारीला होते. या सामन्यात दोन्ही संघांना समान गुण देण्यात आले.

# मतमोजणी शांततेत; प्रशासनाचे व पोलीस यंत्रणेची कामगिरी प्रशंसनीय

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २२ डिसेंबर-**

हदगाव नगरपरिषद २०२५ निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव वांडेकर तर सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे या त्रिमूर्तीने वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार ही निवडणूक प्रक्रिया अगदी सुरुवातीपासूनच म्हणजे दि. १० नोव्हेंबर नामनिर्देशन पत्र दाखल करण्यापासून ते दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी निकाल लागेपर्यंत सदरील कार्यक्रम अतिशय प्रभावी, पारदर्शी व भयमुक्त वातावरणात कुठेही कायदा



व सुव्यवस्थेचे प्रश्न उद्धवु न देता शहरात साधी एन. सी. (अदखलपात्र गुन्हा) दाखल झाल्या नसल्यामुळे मतदारांच्या मिळालेल्या अभूतपूर्व सहकार्यामुळे ही निवडणूक प्रशासनास पार पडण्यात यश मिळाले.

दि. ६ नोव्हेंबर रोजी हदगाव नगर परिषदेचे निवडणूक कार्यक्रम जाहीर झाले तदनंतर दि. १० नोव्हेंबर पासून खरी रणधुमाळी सुरू झाली. नामनिर्देशन पत्र भरण्यापासून ते दि.२ डिसेंबर रोजी मतदान झाल्यानंतर दि.२१ डिसेंबरला मतमोजणी होण्यापर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत जगताप यांच्या खांद्याला-खांदा लावून काम करणारे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी गौरव वांडेकर, चामणीकर,सचिन वाघमारे ,धीरज झुडपे,प्रसाद कदम, सखाराम बोरकर, प्रवीण मंगनाळे, संकेत लांडगे, रवींद्र डेंगळे, गोविंद शिरसाट, प्रशांत डोईजड, प्रणाली मुजमुले,मोनाली रावते यांच्यासह इतर कर्मचारी यांनी नामांकन भरणे, माघार घेणे, याद्या दुरुस्ती करणे तसेच प्रत्यक्ष मतदान काळात व मतमोजणी पर्यंत सगळी यंत्रणा आपापली जबाबदारी सांभाळून सगळी प्रक्रिया अतिशय कुशलतेने हाताळली तर वरिष्ठांचे मार्गदर्शन घेत सहाय्यक पोलीस निरीक्षक संकेत दिघे व त्यांच्या सर्व सहकारी कर्मचाऱ्यांनी यांनी सुद्धा सुरुवातीपासून ते मतमोजणी पर्यंत शहरात कायदा व सुव्यवस्था चा प्रश्न कुठेच उद्धवू दिला नाही. यासाठी हदगाव शहरातील सर्वपक्षीय नेतेमंडळी, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक यांचे ही निवडणूक सुरळीत पार पडण्याकरिता प्रशासनाला व पोलिसांना सहकार्य लाभले.